cmyk

## संपादकीय

### जगास आता कळून चुकले !

भारताने ऑपरेशन सिंदूरद्वारे पाकिस्तानला चारी मुंड्या चीत करून जे काही घवघवीत यश संपादन केले आणि त्यातही पाकिस्तानमधील ९ दहशतवादी तळ उद्ध्वस्त करीत त्यांच्या घरात घुसून जी त्यांच्यावर कारवाई केली, त्यामुळे पाकिस्तानमधील नागरिकांचे हातपाय लटपटले. एवढेच नव्हे तर पाकिस्तानी सैनिक देखील घाबरले. हा चमत्कार नसून ही वस्तुस्थिती आहे. नेहमीच भारताला अण्वस्त्रांची धमकी देणाऱ्या पाकिस्तानला योग्यवेळी योग्य धडा भारताने शिकविला. भारताने ही कारवाई ज्या ठिकाणावरून केली त्या अदमपूर हवाई तळावर जाऊन जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जवानांना सलाम केला.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### सोने ६ हजारांनी घसरले

मुंबई : सोन्याच्या किंमतीत मोठी घसरण झाली आहे. सोन्याचा दर बुधवारी प्रति १० ग्रॅमसाठी ९६ हजार ५९३ रुपयांवर आला आहे. २२ एप्रिल रोजी सोन्याचा दर १ लाख २ हजार ७३ रुपयांपर्यंत पोहोचला होता. त्यामुळे सोन्याच्या दरात आता तोळ्यामागे २० दिवसात जवळपास साडेपाच हजार रुपयांची घसरण झाली आहे. ही सोन्याच्या दरातील मोठी घसरण मानली जात आहे. भारत-पाक युद्ध थांबल्यामुळे आणि अमेरिका-चीनमधील व्यापारयुद्ध टळल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात वेगाने घडामोडी सुरु आहेत. त्यामुळे आगामी काळात सोन्याच्या दरात बऱ्यापैकी घसरण पाहायला मिळेल असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. सध्याच्या काळ हा लग्नसराईचा असल्याने सोन्याच्या दरातील ही घसरण सामान्य वर्गाच्या पथ्यावर पडणारी मानली जात आहे.

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२४ | गुरूवार, दि.१५ मे २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

# खतांच्या लिंकिंगबाबत कंपन्यांवरही कारवाई करा!

## विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची खरीप हंगामपुर्व बैठकीत सूचना

**संभाजीनगर । प्रतिनिधी**

**शेतकऱ्यांना गेल्या वर्षी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई द्यावी. नांदुर मध्यमेश्वरसह अन्य प्रकल्पांतून सिंचनासाठी दिल्या जाणाऱ्या पाण्याच्या आवर्तनाच्या वेळा पाळल्या जाव्यात. खतांच्या लिंकिंगबाबत कारवाई करताना ती खत कंपन्यांवरही करावी. ॲग्रीस्टॅक नोंदणी करताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर कराव्यात, अशा सूचना विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केल्या.**



खरीप हंगामपूर्व नियोजन बैठक सोमवारी (दि.१२) जिल्हा नियोजन सभागृहात पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी सामाजिक न्याय मंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाट, इमाव कल्याण, दुग्ध विकास व अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, अंबादास दानवे, राज्यसभा खासदार डॉ. भागवत कराड, खासदार संदिपान भुमरे, खासदार डॉ. कल्याण काळे, विधान परिषद सदस्य आमदार राजेश राठोड, आमदार संजय केणेकर, विधानसभा सदस्य आमदार रमेश बोरनारे, आमदार प्रशांत बंब, आमदार नारायण कुचे, आमदार अनुराधा चव्हाण, आमदार संजना जाधव, आमदार विलास भुमरे, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रकाश देशमुख, जिल्हा कृषी विकास अधिकारी प्रकाश पाटील तसेच अन्य संबंधित विभागाचे अधिकारी आदी उपस्थित होते. जिल्ह्याच्या खरीप हंगामाचे नियोजन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी देशमुख यांनी सादर केले. आमदार प्रशांत बंब यांनी, बोगस बियाणे वा खते कीटकनाशके यांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई केली जाते. मात्र त्यामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसान भरपाई अदा करण्याची कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी केली. आमदार रमेश बोरनारे यांनी,

पान २ वर

> **शेतकऱ्यांना भरपाई मिळावी**
>
> मंत्री दुग्ध विकास व अपारंपरिक ऊर्जा मंत्री सावे यांनी, मान्सूनपूर्व रोहित्रे व अन्य प्रकारच्या देखभालीचे काम उर्जा विभागाने पूर्ण करावे. अवकाळी पावसामुळे पिकांबरोबरच जनावरांचेही नुकसान झाले आहे. त्याचीही भरपाई शेतकऱ्यांना देण्यात यावी. शेतकऱ्यांना विविध योजनांची माहिती देण्यासाठी गावपातळीवर शेतकऱ्यांचे व्हॉट्सअप ग्रुप तयार करावेत. नुकसान भरपाईपोटी मिळणारी रक्कम कर्ज खात्यात वळती करू नये, असे निर्देश दिले.

## महाराष्ट्राचे सुपुत्र न्यायमूर्ती भूषण गवई यांनी घेतली सरन्यायाधीशपदाची शपथ



**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांनी बुधवारी (दि.१४) देशाचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून शपथ घेतली. राष्ट्रपतीभवनात पार पडलेल्या सोहळ्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी भूषण गवई यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. न्यायमूर्ती गवई हे सरन्यायाधीशपद भूषविणारे पहिले बौद्ध व्यक्ती असून, त्यांचा कार्यकाळ सहा महिने आणि नऊ दिवसांचा असेल.**

५१ वे सरन्यायाधीश संजीव खन्ना मंगळवारी सेवानिवृत्त झाले. ११ नोव्हेंबर २०२४ ते १३ मे २०२५ असा त्यांचा कार्यकाळ होता. सर्वोच्च न्यायालयातील वरिष्ठ न्यायमूर्तींची सरन्यायाधीशपदासाठी शिफारस केली जाते. त्यानुसार १६ एप्रिल रोजी सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी न्यायमूर्ती भूषण गवईंच्या नावाची शिफारस केली. त्यावर २९ एप्रिल २०२५ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शिक्कामोर्तब करत न्यायमूर्ती भूषण गवई यांची देशाचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून नियुक्ती केली. न्या. गवई हे अनुसूचित जातीतून सरन्यायाधीशपदावर पोहोचणारे दुसरे न्यायमूर्ती ठरले आहेत. यापूर्वी न्यायमूर्ती के. जी. बालकृष्णन यांनी २००७ मध्ये सरन्यायाधीशपद भूषवले होते. न्या. भूषण गवई यांचा जन्म २४ नोव्हेंबर १९६० रोजी अमरावती येथे जन्म झाला. त्यांचे वडील रामकृष्ण सूर्यभान गवई आंबेडकरी चळवळीचे नेते होते. अमरावतीचे खासदार, बिहार, सिक्कीम आणि केरळचे राज्यपाल असा त्यांचा कार्यकाळ

पान २ वर

## कर्नल सोफिया कुरेशी यांच्याविरोधात वक्तव्य करणाऱ्या भाजप मंत्र्याविरोधात गुन्हा दाखल



> **काँग्रेसकडून फिर्याद**
>
> भाजपाचे मंत्री विजय शहा यांच्या विरोधात मध्यप्रदेशचे काँगेस प्रमुख जीतू पटवारी यांनी गुन्हा दाखल केला आहे. त्यांनी म्हटले आहे की पंतप्रधान मोदी यांनी सैन्यदालाच्या पाठीशी खंबीर पणे उभे असल्याचे म्हटले आहे. पण त्यांच्याच पक्षाचे नेते सैन्यदलातील आपल्या भगीनींचा अपमान करतात. यावर का मौन साधले आहे.

**भोपाळ । प्रतिनिधी**

**ऑपरेशन सिंदूर मध्ये महत्वाची भूमिका बजावणाऱ्या व देशभरात कौतुकास प्राप्त ठरलेल्या कर्नल सोफिया कुरेशी यांच्याविरोधात एका मध्य प्रदेशातील भाजपच्या मंत्र्यांने वादग्रस्त वक्तव्य केले होते. याची गंभीर दखल घेत मध्ये प्रदेशातील जबलपूर न्यायालयाने संबंधित मंत्र्याविरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत.**

जबलपूर उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने सुमोटो दाखल करुन घेत हा आदेश दिला. भाजपाचे मध्यप्रदेश सरकारमधील भाजपाचे मंत्री विजय शहा यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. न्यायालयाने पुढे म्हटले की शहा यांची कुरेशी यांच्या विरोधातील टिप्पणीला अपमानास्पद आणि सांप्रदायिक स्वरूपाची आहे. ज्यामुळे सर्वत्र तीव्र संताप आणि राजकीय प्रतिक्रियेला उमटत आहेत. यामुळे हा गंभीर स्वरुपाचा गुन्हा आहे. शहा यांच्या वादग्रस्त टिपणीनंतर काँग्रेसने भाजपावर टिकेची झोड उठवली आहे. त्यांनी शहा यांच्या प्रतिक्रयेचा एक व्हिडीओ सुद्धा व्हायरल केला आहे. 'जिन्होने हमारी बेटीयोंके सिंदूर

पान २ वर

## पाकिस्तानी हद्दीत चूकून गेलेल्या जवानाला सोडले



**श्रीनगर । वृत्तसंस्था**

२३ एप्रिल रोजी पंजाब सीमेवरून चुकून पाकिस्तानी हद्दीत घुसलेल्या सीमा सुरक्षा दलाच्या (बीएसएफ) कॉन्स्टेबलला बुधवारी पाकिस्तान रेंजर्सनी परत सोडले. बीएसएफने जारी केलेल्या अधिकृत निवेदनानुसार, सकाळी १०:३० वाजता अटारी-वाघा सीमेवर सोडण्यात आले. पूर्णम कुमार शॉ असे या कॉन्स्टेबलचे नाव असून त्याने ऑपरेशनल ड्युटी दरम्यान फिरोजपूर सेक्टरमध्ये आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडली होती. तो सीमा कुंपणाच्या पलीकडे स्थानिक शेतकऱ्यांसोबत जात होता, जिथे शून्य रेषेपर्यंत शेतीची कामे करण्यास परवानगी आहे. या प्रदेशातील सीमा कुंपण सामान्यतः भारतीय हद्दीत सुमारे १५० यार्ड आत आहे, आणि त्या दरम्यानच्या मोकळ्या भागात कोणतेही संरक्षण बांधकाम करण्यास परवानगी नाही.

पान २ वर

## पाकिस्ताननंतर आता चीनची आगळीक

### अरूणाचल प्रदेशमधील २७ ठिकाणांना नवीन नावे देण्याचा प्रयत्न




**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

अरुणाचल प्रदेशमधील २७ ठिकाणांना नवीन नावे देण्याचा चीनचा ताजा प्रयत्न भारताने ठाम शब्दांत फेटाळला आहे. परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्टपणे सांगितले की, नावे बदलल्याने भौगोलिक वस्तुस्थिती बदलत नाही, अरुणाचल प्रदेश हा भारताचा अविभाज्य भाग होता, आहे आणि कायम राहील.

पान २ वर

## बीड शहरात मान्सूनपूर्व स्वच्छता मोहीम

### आ.संदीप क्षीरसागर यांनी घेतली नगरपालिकेची आढावा बैठक

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरात मान्सूनपूर्व स्वच्छता मोहीम प्रभावीपणे राबवण्यासाठी आ. संदीप क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि. १३) रोजी नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली.**



या बैठकीत शहरातील नालेसफाई, रस्त्यांची स्वच्छता, आणि पाण्याचा निचरा यासंबंधी सविस्तर चर्चा झाली. आ. क्षीरसागर यांनी अधिकाऱ्यांना मान्सूनापूर्वी सर्व नाल्यांची साफसफाई पूर्ण करण्यासाठी नियोजन

पान २ वर

## ग्रामविकास विभागाचे उप आयुक्त झाले 'अप्पर आयुक्त'

### ग्रामविकास मंत्री ना. जयप्रकाश गोरे यांचा मोठा निर्णय

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विकास सेवा गट अ संवर्गातील उपायुक्त आस्थापना व उपायुक्त विकास यांच्या पदनामांमध्ये बदल करणे बाबत महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित अधिकारी संघटनेच्या वतीने शासनाकडे वारंवार विनंती केली होती. सदर मागणी ही संघटनेच्या वतीने अनेक वर्षापासून करण्यात येत होती. ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांच्याकडे वारंवार बैठका देखील संघटनेच्या वतीने घेण्यात आलेल्या होत्या. अखेर ग्रामविकास व पंचायत राजमंत्री ना. जयकुमार गोरे यांच्या मान्यतेने ग्रामविकास विभागाचे उप आयुक्त हे अप्पर आयुक्त झाले.

त्या अनुषंगाने दि. १३ मे २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार

पान २ वर


## मान्सूनचा मुक्काम; राज्यात पुढील ५ दिवस वादळी पावसाचा अंदाज

**पुणे । प्रतिनिधी**

**मान्सूनने अंदमानला धडक दिल्यानंतर त्याच भागात बुधवारी सुद्धा मुक्काम केला. पोषक हवामान असल्याने मान्सून पुढील २ ते ३ दिवसांत आणखी काही भागात वाटचाल करेल, असा अंदाज हवामान विभागाने दिला. तसेच राज्यात वादळी पावसाला पोषक हवामान आहे. विदर्भ, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ तसेच कोकणातील काही ठिकाणी पुढील ५ दिवस वादळी पाऊस पडेल, अशी शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.**

मान्सूनने मंगळवारी दक्षिण बंगालच्या उपसागराचा काही भाग, दक्षिण

पान २ वर



### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१४ मे २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४४.५० क्विंटल | २,३०० | २,९३९ | २,६४२ |
| ज्वारी/हायब्रिड: १५३.५० क्विंटल | २,००० | ३,०५० | २,३६२ |
| मका/लोकल:२८.०० क्विंटल | २,१५१ | २,१८१ | २,१६६ |
| तूर : ५०.०० क्विंटल | ६,५१० | ६,७६५ | ६,६९२ |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: १३५.०० क्विंटल | २,१८० | २,६९० | २,४५१ |
| मुग :४.५० क्विंटल | ७,२०१ | ७,५०० | ७,३५० |
| सोयाबीन: ७३.०० क्विंटल | ४,०५० | ४,३०० | ४,२०७ |
| हरभरा: १६.५० क्विंटल | ५,३०० | ५,४८० | ५,४०० |

# सीसीटिव्ही न बसविल्यास खासगी शाळांची मान्यता रद्द होणार!

## न्यायालयाने नेमलेल्या समितीचा अहवाल आल्यानंतर शासनाने काढला आदेश

**मुंबई । प्रतिनिधी**

**बदलापूर येथील शाळेत दोन लहान चिमुरड्यांवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेपासून धडा घेतलेल्या राज्य सरकारने अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आता खासगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये आणि शाळेच्या परिसरातील मोक्याच्या ठिकाणी सीसीटीव्ही लावणे बंधनकारक केले आहे. या नियमाचे पालन न केल्यास खासगी शाळांचे अनुदान रोखले जाईल किंवा शाळेची मान्यता रद्द करण्यात येणार आहे. तसेच सरकारी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेमध्ये सीसीटीव्ही बसविण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत शालेय विभागासाठी ५ टक्के निधी राखीव ठेवण्यास मंजूरी देण्यात आली आहे.**



> **विद्यार्थ्यांची अनुपस्थिती एसएमएसद्वारे मिळणार**
>
> विद्यार्थी शाळेच्या परिसरात उपस्थित असताना त्याच्या सुरक्षिततेची संपूर्ण जबाबदारी शाळेची राहणार असून, त्यासाठी सर्व शाळांना चोहोबाजूंनी भिंती आणि मुख्य प्रवेशद्वार ठेवावे लागणार आहे. मुख्य प्रवेशद्वारावर सुरक्षा रक्षक असावा आणि शाळेच्या परिसरामध्ये कोणतीही अनधिकृत व्यक्ती प्रवेश करणार नाही याची दक्षता घ्यावी लागणार आहे. तसेच शाळेतील मुलांच्या उपस्थिती संदर्भात सकाळी, दुपारी आणि शाळा सुटण्याच्या वेळेस संध्याकाळी हजेरी नोंदविण्यात यावी व अनुपस्थित विद्यार्थ्यांबाबत त्यांच्या पालकांना एसएमएसव्दारे कळवावे लागणार आहे.

बदलापूर येथील शाळेतील घटनेनंतर उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सेवानिवृत्त न्यायाधीश साधना एस. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ. शालिनी फणसाळकर-जोशी यांच्या सह अध्यक्षतेखाली विभागाच्या २६ सप्टेंबर, २०२४ रोजी समिती स्थापन करण्यात आली होती. न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार या समितीची कार्यकक्षाही निश्चित करण्यात आली होती. या समितीने आपल्या शिफारशींचा अहवाल समितीचे सदस्य सचिव तथा शिक्षण संचालक (प्राथमिक), पुणे यांना २५ फेब्रुवारी २०२५ रोजी सादर केला होता. समितीने त्यांच्या अहवालाद्वारे केलेल्या

पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# जगास आता कळून चुकले !

भारताने ऑपरेशन सिंदूरद्वारे पाकिस्तानला चारी मुंड्या चीत करून जे काही घवघवीत यश संपादन केले आणि त्यातही पाकिस्तानमधील ९ दहशतवादी तळ उद्ध्वस्त करीत त्यांच्या घरात घुसून जी त्यांच्यावर कारवाई केली, त्यामुळे पाकिस्तानमधील नागरिकांचे हातपाय लटपटले. एवढेच नव्हे तर पाकिस्तानी सैनिक देखील घाबरले. हा चमत्कार नसून ही वस्तुस्थिती आहे. नेहमीच भारताला अण्वस्त्रांची धमकी देणाऱ्या पाकिस्तानला योग्यवेळी योग्य धडा भारताने शिकविला. भारताने ही कारवाई ज्या ठिकाणावरून केली त्या अदमपूर हवाई तळावर जाऊन जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जवानांना सलाम केला त्यावेळी जवानांच्या तोंडून जी घोषणा निघाली ती होती 'भारत माता की जय'. या युद्धामुळे किंवा ऑपरेशन सिंदूरमुळे एक गोष्ट प्रकर्षाने दिसून आली, ती म्हणजे भारतातील मुसलमान मंडळी देखील भारत सरकारच्या बाजूने भक्कमपणे उभी राहिली. त्यांनाही कळून चुकले की देश संरक्षणासाठी मोदींचे नेतृत्व हे अत्यंत योग्य आणि अचूक आहे. जरी भारत बुद्धाची भूमी असली तरी देखील ती गुरू गोविंद सिंह यांची देखील भूमी आहे, असे उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काढले. याचा अर्थ असा आहे की आम्हाला शांतता देखील हवी आहे, परंतु आम्ही शांतपणे ज्यावेळी पुढे जात असतो त्यावेळी आमच्या वाटेत येऊन काटे टाकून आमचा मार्ग रोखण्याचा प्रयत्न केला, आमच्या माता-भगिनींचे कुंकू पुसण्याचा अश्लाघ्य प्रयत्न केलात, तर शस्त्र उचलणारच!

गुरू गोविंद सिंह यांनी एक तत्त्वज्ञान सांगितलेले आहे. त्यात त्यांनी म्हटलेले आहे की सव्वा लाखसे एक लढाऊँ चिडियन ते मै बाज तुडाऊं तबै गुऊ गोविंदसिंह नाम कहावूं. आपल्या धर्माच्या रक्षणासाठी शस्त्र उचलणं ही आपली परंपरा आहे आणि पंतप्रधानांनी हेच वाक्य भारतीय जवानांसमोर उद्धृत केलं आणि त्यावेळी पुन्हा एकदा 'भारत माता की जय'च्या घोषणा घुमल्या. पंतप्रधान म्हणतात की आमच्या बहिणी आणि मुलींचं कुंकू पुसून काढलं तेव्हा त्यांनी क्रौर्याचे फार मोठे शिखर गाठले. आता इथे आम्ही शांत बसू शकत नाही. त्यामुळेच दहशतवाद्यांच्या घरात घुसून त्यांचे पंख छाटलेले आहेत. संपूर्ण जगात आज भारत ताठ मान करून स्वाभिमानाने उभा आहे. भारत माता की जय या घोषणेमध्ये जी ताकद आहे ती भारतीय जवानांनी संपूर्ण जगाला दाखवून दिली. ऑपरेशन सिंदूरद्वारे भारताने पाकला कायमचा धडा शिकवलाच. त्याचबरोबर संपूर्ण जगाला ठासून सांगितले की 'या भूमीवर वीरश्रीने सीमेवर लढतात जवान, जगास आता कळून चुकले, भारत काही नाही लहान'. धडा केवळ पाकिस्तानलाच होता असे नाही, चीनलाही त्यातून एक प्रकारे संदेश भारताने पोहोचविला. चीनने तयार केलेली क्षेपणास्त्र किती तकलादू होती याचा पुरावाच भारताने त्यांची क्षेपणास्त्र निकामी करून दाखवून दिला. पाकला पुन्हा पूर्वपदावर येण्यासाठी आता किमान सात-आठ वर्षे तरी निश्चितच लागतील. भारताशी पंगा घेतला की काय अवस्था होते असे म्हणण्यापेक्षा 'त्याचा पाकिस्तान होतो' अशी नवी व्याख्या या ऑपरेशन सिंदूरद्वारे स्पष्ट झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भक्कम नेतृत्व आणि दूरदृष्टीकोन यामुळेच पाकिस्तान भारताला घाबरून उरले. आता पुन्हा भारताकडे वक्रदृष्टी करण्याचा धीर यापुढे कधीही पाकिस्तानला होणार नाही. शस्त्रसंधी शिवाय पाकिस्तानकडे दुसरा कोणताही पर्याय नव्हता. म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या संपूर्ण घटनेनंतर मंगळवारी सायंकाळी देशाला उद्बोधन करताना लपून राहिलेल्यांचा देखील तेथेच बीमोड करू असा सज्जड इशारा दिला. त्याचबरोबर यानंतर भारताशी जरासुद्धा आगळीक केली तर गंभीर परिणाम होतील असा इशारा दिला आहे. एवढेच नव्हे तर सिंदूर अभियान हे संपलेले नसून ते तात्पुरते थांबविलेले आहे. पाकिस्तानने जर का दहशतवादाचा खात्मा केला नाही तर पाकिस्तानला भयंकर परिस्थितीला तोंड द्यावे लागेल आणि त्यावेळी पाकिस्तानच्या मदतीला कोणीही येणार नाही. २२ एप्रिल रोजी पहलगाम येथे २६ भारतीयांची निर्घृण हत्या करणाऱ्या पाकिस्तानच्या दहशतवाद्यांनी अनेक भारतीय नारीचे कुंकू पुसले. या कुंकवाची किंमत काय आहे हे दाखवून देण्यासाठीच भारताने पाकिस्तानातील दहशतवाद्यांना संपुष्टात आणण्याकरिता जे अभियान राबविले त्याला सिंदूर हे नाव दिले आणि या ऐतिहासिक कारवाईतून पाकिस्तानला कायमचा धडा भारताने शिकविला. भारतीय सैनिकांनी अणुबॉम्बच्या धमकीची हवाच काढून घेतली आणि हे करीत असताना आकाशापासून पाताळापर्यंत एकच आवाज घुमतो तो म्हणजे भारत माता की जय आणि या घोषणेतून भारतीय जवानांनी भारतीयांची मान उंचावली अशा शब्दात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जवानांचे कौतुक केले आणि त्यांच्यामध्ये उत्साह निर्माण केला. एवढेच नव्हे तर या जवानांमध्ये त्यांनी प्रेरक असे वातावरण निर्माण केले. त्यांच्या मनगटात ताकद निर्माण करण्याचे काम पंतप्रधानांनी केलेले आहे. म्हणूनच त्यांनी अदमपूरच्या तळाला भेट देऊन जवानांचे कौतुक केले आणि जवानांमध्ये चैतन्य निर्माण केले. ऑपरेशन सिंदूरमुळे भारतीयांमध्ये पुन्हा एकदा जागृती निर्माण झाली. आपल्या धर्माच्या रक्षणासाठी शस्त्र उचलणे ही आपली परंपरा आहे आणि त्या तत्त्वांचे पालन आपल्याला करावंच लागेल हे निवेदन करून पंतप्रधानांनी संपूर्ण देशभरात युवाशक्तीमध्ये चैतन्य निर्माण केले आहे. भारताच्या सिंदूर अभियानातून देशातील सर्व जाती धर्मातील मंडळींना एकत्र आणण्याचे काम केलेले आहे. राजकारणाची वल्कले बाजूला ठेवून सारे देशवासी या ठिकाणी एकत्र आले आणि त्यामुळेच भारताला घवघवीत यश संपादन करता आले. वास्तविक हे अभियान साधेसुधे नसून भारताने एका निर्णयाप्रत लढाई जिंकलेली आहे. पाकिस्तानचा भारताने थरकाप उडवून दिला. यानंतर भारताला आव्हान देण्यापूर्वी पाकिस्तानला चारवेळा विचार करावा लागेल. सिंदूर ऑपरेशनमुळे भारताने जगाला दोन गोष्टी दाखवून दिलेल्या आहेत. त्याचबरोबर आम्ही शांतता राखण्यासदेखील नेहमीच पुढाकार घेतो परंतु गरज नसताना आम्हाला त्रास देण्याचा प्रयत्न केल्यास आम्ही जशास तसे उत्तर देऊ शकतो आणि तशी आमची क्षमता आहे.

# ढेकनमोह,चौसाळा आणि बीड शहरात शिवसंग्रम सदस्य नोंदणीस उत्स्फूर्त प्रतिसाद

## सदस्य नोंदणीच्या दुसऱ्या टप्प्यात ग्रामीण भागात शिवसंग्रामचे सदस्य नोंदणी अभियान



**बीड । प्रतिनिधी**

**पुणे येथे पार पडलेल्या शिवसंग्रामच्या राज्यस्तरीय बैठकीमध्ये अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी राज्यस्तरीय सदस्य नोंदणी अभियानाची घोषणा केली होती. त्यानुसार राज्यामध्ये १ मे ३० मे या कालावधीत हे अभियान राबवण्यात येणार आहे. काल दि. १३ मे रोजी नाळवंडी सर्कलच्या वतीने ढेकनमोह येथे तर आज छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त चौसाळा सर्कल शिवसंग्रामच्या वतीने चौसाळा येथे सदस्य नोंदणी अभियानास सुरुवात करण्यात आली. यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.**

लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांनी स्थापन केलेली शिवसंग्राम तळागळा पर्यंत पोहचवण्यासाठी शिवसंग्राम सदस्य नोंदणी कार्यक्रम आपण हाती घेत आहोत अशी घोषणा शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी केली होती. या सदस्य नोंदणीची सुरवात दि. २ मे रोजी जिल्ह्यात करण्यात आली. आता दुसऱ्या टप्प्यात तालुक्यात आणि सर्कल निहाय सदस्य नोंदणी अभियानाची सुरुवात करण्यात आली आहे. यात नाळवंडी सर्कलच्या वतीने ढेकनमोह , चौसाळा सर्कल शिवसंग्रामच्या वतीने चौसाळा , बीड शहरातील अल्पसंख्यांक बहुल भागात आणि भाळवनी या ठिकाणी सदस्य नोंदणी अभियान पार पडले यावेळी या सदस्य नोंदणीस जनतेने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून लोकनेते यांचा विचार जिवंत ठेवण्यासाठी आपण शिवसंग्रामचे सदस्य होता असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.यावेळी शिवसंग्रामचे जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष जाधव, सरचिटणीस अनिल घुमरे पाटील,उपाध्यक्ष रामदास नाईकवाडे, सचिन कोटुळे, तालुकाध्यक्ष तथा कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक पंडितराव माने,युवक जिल्हाध्यक्ष सुनील कुटे,गणेश धोंडरे सचिन जाधव, चौसाळा सर्कल प्रमुख विशाल हावळे, गौतम जोगदंड, राजु येडे, शिवसंग्रामचे तालुकाउपाध्यक्ष दिनकर शेळके,तालुका सचिव सिताराम घुमरे,नाळवंडी सर्कल प्रमुख नागुराव बोरगे, डेकनमोह गण प्रमुख विलास चव्हाण,पाली गण प्रमुख चंद्रकांत देवकर,विजय सुपेकर, बळीभाऊ थापडे,उल्हास घोरड,वैभव डावकर आदीसह कार्यकर्ते, पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नवनाथ ससाने यांचे निधन

**आष्टी । प्रतिनिधी**

**चेहऱ्यावर कायम हास्य आणि प्रत्येक भेटणाऱ्या व्यक्तीला आदरातिथ्याने बोलून त्यांच्या चेहऱ्यावर आपुलकीचे भाव निर्माण करणाऱ्या नवनाथ ससाणे यांचे बुधवारी आकस्मित निधन झाले.वयाच्या ४४ व्या वर्षी नवनाथणे जगाचा निरोप घेतला.त्याच्या जाण्याने समस्त आष्टी शहरवासीयांनी हळहळ व्यक्त करत अश्रू ढाळले.**



आष्टी शहरातील कसबा पेठ येथे राहणारा नवनाथ ससाने हा गेल्या २२ वर्षापासून कमलेश मेडिकल नवीन कासवा यांच्या मेडिकल स्टोर मध्ये कामगार म्हणून काम करत होता सर्व परिचित आणि मनमिळावू हसतमुख अशी ओळख त्याने स्वतःची शहरांमध्ये निर्माण केली होती गेल्या दोन दिवसापूर्वीच आष्टी शहरांमध्ये १९९६ साली उत्तीर्ण झालेल्या दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी गेट-टुगेदर चे आयोजन करण्यात आले होते नवनाथ देखील त्याब्याचा विद्यार्थी असल्याने गत दोन महिन्यापासून तो हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अहोरात्र झटप देखील होता १३० विद्यार्थ्यांचा हा स्नेह मेळावा अत्यंत उत्साहात पार पाडण्यासाठी नवनाथ ने देखील मोठी मेहनत घेतली होती. नवनाथ ससाने येणारा जाणाऱ्या प्रत्येक माणसांसाठी आपल्या चेहऱ्यावरील हास्य फुलवून इतरांना आनंद देण्याचे काम करत होता. कायम चेहऱ्यावर हास्य असल्याने या व्यक्तिमत्त्वाकडे आष्टी शहरातील प्रत्येक नागरिक आदर भावाने पाहत होता. मात्र बुधवारी सकाळी नवनाथ ससाने यांनी आपले जीवन संपवत या जगाचा निरोप घेतला. त्याच्या निधनाची वार्ता आष्टी शहरांमध्ये वाऱ्यासारखी सर्वत्र पसरली. सर्व आष्टीकर त्याच्या आकस्मित निधनाने अक्षरशः हळहळले. बुधवारी दुपारी आष्टी शहरातील स्मशानभूमीत नवनाथ ससाने याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आली यावेळी त्याचे मित्र,शहरातील व्यापारी, राजकीय, शैक्षणिक आदी क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवनाथ ससाने यांच्या पश्चात पत्नी दोन मुली असा परिवार असून एका मुलीचा दतवर्षीच मोठ्या थाटामाटात त्याने विवाह केला होता.



बीड: जिल्ह्यातील पूर्णकृती छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करताना अ. भा. छावा संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक (अण्णा) रोमन, व सर्व छावा मित्रपरिवार

# 'ऑपरेशन सिंदूर'च्या यशानंतर भारतीय सेनेच्या सन्मानार्थ भव्य तिरंगा यात्रा

## मुंबईत मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्र्यांसमवेत पंकजा मुंडेंचा सहभाग

मुंबई । प्रतिनिधी

भारतीय सेनेने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे दाखविलेल्या शौर्य, संयम आणि बलिदानाच्या सन्मानार्थ भव्य तिरंगा यात्रा आयोजित करण्यात आली. या यात्रेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सोबत राज्याच्या पर्यावरण व वातारणीय बदल तसेच पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताइ मुंडे सहभागी झाल्या होत्या. याप्रसंगी देशसेवा केलेल्या सैन्यदलातील सेवानिवृत्त अधिकारी आणि जवानांची लक्षणीय उपस्थिती होती.



ऑगस्ट क्रांती मैदान ते गिरगाव चौपाटीपर्यंत काढलेल्या या तिरंगा यात्रेला मुंबईकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ऑगस्ट क्रांती मैदानातील स्तंभाला अभिवादन करून तिरंगा यात्रेला सुरुवात झाली आणि गिरगाव चौपाटी येथील हुतात्मा तुकाराम ओंबाळे यांच्या पुतळ्याला पुष्पचक्र अर्पण करत अभिवादन करून या यात्रेचा समारोप झाला. या तिरंगा यात्रेत भाजपाचे प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण, मंत्री आशिषजी शेलार, मंगलप्रभात लोढा तसेच भाजपाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पान १ वरून...

### खतांच्या लिंकिंगबाबत कंपन्यांवरही

खतांचे लिंकिंग होऊ नये यासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्याची सूचना केली. आमदार संजना जाधव यांनी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेत शेतकऱ्यांच्या कुटुंबास लाभ मिळावा यासाठी अटी शिथिल कराव्यात, अशी सूचना केली. आमदार अनुराधा चव्हाण यांनी ॲग्रीस्टॅकसाठी गावपातळीवर माहिती पोहोचवावी यासाठी मोहीम राबविण्याची सूचना केली. खासदार डॉ. काळे यांनी, खतांचे लिंकिंग करणाऱ्यांवर कारवाई करावी. पीककर्ज ३० जूनपर्यंत वाटप करावे, अशा सूचना केल्या. खासदार भुमरे यांनी धरणाच्या बॅकवॉटर क्षेत्रातील शेतकऱ्यांकडे अल्प क्षेत्र शिल्लक आहे. मागेल त्याला सोलार या योजनेसाठी असे शेतकरी पात्र ठरत नाहीत. त्यासाठी हे निकष बदलावेत, अशी सूचना केली.

-----------

### कर्नल सोफिया कुरेशी यांच्याविरोधात वक्तव्य

उजाडे है, हमने उनकी बहण भेज कर के उनकी ऐसी की तैसी करवाई है' अशा पद्धतीचे वादग्रस्त विधान करताना विजय शहा या व्हिडीओत दिसत आहेत. काँगेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी तिव्र शब्दात निषेध व्यक्त करताना म्हटले की 'अंत्यत अपमानजनक, लज्जास्पद व अश्लाघ्य भाषा' ही कर्नल कुरेशी यांच्याबाबतीत वापरली आहे. पहलगाम दहशतवादी हल्ला करुन दहशतवाद्यांचे मनसुबे हा भारतात विभाजन करण्याचा होता पण ऑपरेशन सिंदूर ने तो उधळला असेही त्यांनी पुढे म्हटले आहे. तसेच ते खर्गे पुढे म्हणाले की भाजप व आरएसएसची मानसिकताच स्त्रियाच्या विरोधातील आहे. पहिल्यांदा त्यांनी पहलगाममध्ये शहीद झालेल्या नौदल अधिकाऱ्याच्या पत्नीचा सोशल मीडियावर अपमान केला, नंतर परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांच्या मुलीला सोशल मिडीयाच्या माध्यमातून त्रास दिला, आणि आता भाजपचे मंत्री कर्नल सोफिया कुरेशीबद्दल अश्लील आणि अयोग्य वक्तव्य करत आहेत. अशां मंत्र्यांना पंतप्रधान मोदींनी तात्काळ बडतर्फ केले पाहिजे. अशी मागणीही त्यांनी केली.

------------

### महाराष्ट्राचे सुपुत्र न्यायमूर्ती भूषण गवई

राहिलेला आहे. वडील राजकारणात असल्याने न्यायमूर्ती गवईंना लहानपणापासूनच सामाजिक आणि राजकीय कार्याची पार्श्वभूमी आहे. वयाच्या पंचविशीत १६ मार्च १९८५ रोजी त्यांनी वकिलीला सुरुवात केली. मुंबई उच्च न्यायालयाचे माजी महाधिवक्ता आणि माजी न्यायाधीश राजा एस. भोसले यांच्यासोबत १९८७ पर्यंत काम केले. १९८७ ते १९९० पर्यंत मुंबई उच्च न्यायालयात स्वतंत्रपणे वकिली केली. १९९० नंतर, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात त्यांनी वकिली केली. नागपूर महानगरपालिका, अमरावती महानगरपालिका आणि अमरावती विद्यापीठाचे स्थायी वकील होते. ऑगस्ट १९९२ ते जुलै १९९३ पर्यंत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात सहायक सरकारी वकील आणि अतिरिक्त सरकारी वकील म्हणून नियुक्ती झाली. १४ नोव्हेंबर २००३ रोजी न्यायमूर्ती गवई त्यांची मुंबई उच्च न्यायालयाच्या अतिरिक्त न्यायाधीशपदी नेमणूक करण्यात आली होती. २४ मे २०१९ रोजी त्यांना सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीशपदी त्यांची नियुक्ती झाली. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश असताना अनेक ऐतिहासिक निकालांच्या खंडपीठात त्यांचा समावेश होता. न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या वडिलांची राजकीय पार्श्वभूमी असली, तरीही भविष्यात निवृत्तीनंतर कोणतेही पद स्वीकारणार नसल्याचे त्यांनी शपथ घेण्याअगोदरच स्पष्ट केले. संविधान सर्वोच्च असल्याची टिपणीही त्यांनी अलीकडेच केली आहे. २३ नोव्हेंबर २०२५ पर्यंत ते सरन्यायाधीश पदावर कार्यरत असतील.

-----------

### बीड शहरात मान्सूनपूर्व

करण्याचे निर्देश दिले. बीडकरांना पावसाळ्यातील समस्यांना सामोरे जावे लागू नये, यासाठी नियोजनबद्ध काम करणे गरजेचे आहे,असे आ.संदीप क्षीरसागरांनी यावेळी सांगितले. येत्या १० ते १२ दिवसांमध्ये शहरात मान्सूनपूर्व स्वच्छता मोहीम पूर्ण करण्याचे नियोजन करून स्वच्छता मोहीम युध्दपातळीवर राबविण्याचे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी नगरपालिकेला दिले आहेत.

---------------

### पाकिस्ताननंतर आता

चीनच्या नागरी उड्डाण मंत्रालयाने ११ ते १२ मे २०२५ रोजी अरुणाचल प्रदेशमधील २७ ठिकाणांची नवीन नावे प्रसिद्ध केली होती. यानंतर दोन दिवसांनी भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने याबाबत प्रतिक्रिया दिली आहे. परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले आहे की, चीनकडून भारतीय राज्य असलेल्या अरुणाचल प्रदेशातील ठिकाणांना नवीन नावे देण्याचे निरर्थक व हास्यास्पद प्रयत्न सुरूच आहेत. आमच्या ठाम भूमिकेनुसार, आम्ही अशा प्रयत्नांना स्पष्टपणे नाकारतो. मंत्रालयाने पुढे नमूद केले आहे की, कल्पनाशक्तीने ठेवलेली नावे वास्तव बदलू शकत नाहीत. अरुणाचल प्रदेश हा भारताचा अविभाज्य भाग आणि घटक राज्य आहे आणि तो नेहमीच राहणार आहे. यापूर्वीही चीनने अरुणाचल प्रदेशातील भूप्रदेशांवर दावा सांगत 'प्रमाणित नावे' जाहीर केली होती. एप्रिल २०२४ मध्ये चीनने अरुणाचल प्रदेशातल्या ३० ठिकाणांची नावे बदलली होती. त्याची चौथी यादी प्रसिद्ध केली होती. यामध्ये अरूणाचल प्रदेशमधील १२ डोंगर, ४ नद्या, १ सरोवर, १ पर्वतमार्ग, ११ वसाहती आणि १ भूभाग यांचा समावेश होता. याआधी २०१७ मध्ये चीनने ६ ठिकाणांची नावे बदलण्याची पहिली यादी जाहीर केली होती. त्यानंतर २०२१ मध्ये १५ ठिकाणे आणि २०२३ मध्ये ११ ठिकाणांची नावे बदलण्याचे प्रयत्न झाले.

-----------

### पाकिस्तानी हद्दीत चूकून

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या दुसऱ्याच दिवशी श्री. शॉ यांना ताब्यात घेण्यात आले. नियमित ध्वज बैठकी आणि पाकिस्तान रेंजर्सशी सतत संवाद साधून सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे त्यांचे मायदेशी परत पाठवणे शक्य झाले, असे बीएसएफने म्हटले आहे.

-----------

### मान्सूनचा मुक्काम; राज्यात पुढील

अंदमान समुद्राचा काही भाग, निकोबार बेटांचा काही भाग आणि उत्तर अंदमान समुद्राच्या काही भागात प्रगती केली होती. मात्र बुधवारी मान्सूनचा मुक्काम त्याच भागात होता. तसेच मान्सूनच्या वाटचालीसाठी पोषक हवामान आहे. त्यामुळे पुढील २ ते ३ दिवसांत मान्सून दक्षिण अरबी समुद्राचा काही भाग, मालदीव आणि कोमोरिनचा काही भाग तसेच दक्षिण बंगालच्या उपसागराचा काही भाग, संपूर्ण अंदमान आणि निकोबार बेटे, अंदमान समुद्राचा उरलेला भाग आणि मध्य बंगालच्या उपसागराच्या काही भागात प्रगती करेल, असा अंदाज हवामान विभागाने दिला. राज्यातील काही भागात मागील ४ दिवसांपासून पाऊस हजेरी लावत आहे. ढगाळ हवामानामुळे तापमानातही घट दिसत आहे. पावसामुळे शेतकऱ्यांची मशागतीची कामे रखडली आहेत. तसेच काही ठिकाणी पिकांनाही फटका बसत आहे. राज्यात काही ठिकाणी पुढील ५ दिवस वादळी पावसासाठी पोषक हवामान आहे, असा अंदाज हवामान विभागाने दिला. मध्य महाराष्ट्रातील सोलापूर, कोल्हापूर, सातारा, सांगली, पुणे आणि अहिल्यानगर तसेच नाशिक जिल्ह्यातही काही ठिकाणी वादळी पाऊस दणका देण्याची शक्यता आहे. खानदेशातील जळगाव, धुळे आणि नंदूरबार जिल्ह्यातही पावसाचा अंदाज आहे. कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, पालघर, ठाणे आणि मुंबई जिल्ह्यातही वादळी पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला.

**मराठवाडा, विदर्भात वादळी पावसाचा अंदाज**

विदर्भातील नागपूर, अमरावती, अकोला, वाशीम, बुलडाणा, यवतमाळ, वर्धा, भंडारा, गोंदीया, गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यात काही ठिकाणी पुढील ५ दिवस वादळी पावसाचा अंदाज आहे. तसेच मराठवाड्यातील जालना, बीड, हिंगोली, परभणी, नांदेड, लातूर, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव जिल्ह्यातही काही ठिकाणी पुढील ५ दिवस वादळी पावसाला पोषक हवामान आहे, असा अंदाज हवामान विभागाने दिला.

-----------

### ग्रामविकास विभागाचे उप

शासनाने महाराष्ट्र विकास सेवा गट-अ संवर्गातील उप आयुक्त (आस्थापना) व उप आयुक्त (विकास) यांच्या पदनामांमध्ये अप्पर आयुक्त (आस्थापना) व अप्पर आयुक्त (विकास) असा बदल केलेला आहे. पदनामातील बदलामुळे महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित अधिकारी संघटनेतील अधिकारी यांचे कडून समाधान व्यक्त करण्यात आले आहे. राज्याच्या ग्रामविकास कार्यात अधिक गतीमानता आणण्याचा तसेच शासनाच्या योजनेचा लाभ तळागाळातील नागरीकापर्यंत पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित अधिकारी अधिक सक्षमपणे काम करतील. सदर निर्णयासाठी मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री ना.अजित पवार, ग्राम विकास व पंचायत राज मंत्री ना. जयकुमार गोरे, राज्यमंत्री ना. योगेश कदम यांच्यासह प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी संघटनेच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देऊन अनेक वर्षापासून प्रलंबित असलेली मागणी पूर्ण केली आहे. महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित अधिकारी संघटनेच्या वतीने या सर्वांचे आभार व्यक्त करण्यात आले आहेत. सदर निर्णय व्हावा यासाठी महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित संघटनेचे अध्यक्ष सुरेश बेदमुथा सरचिटणीस वासुदेव सोळंके यांच्यासह सर्व संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता.

------------

### सीसीटिव्ही न बसविल्यास खासगी

शिफारशी या शालेय शिक्षण व क्रीडा विभागासह महिला व बाल विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, वित्त विभाग, गृह विभाग, परिवहन विभाग इत्यादी विभागांशी संबंधित आहेत. समितीने केलेल्या शिफारशी स्वीकारत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने या संदर्भातील शासन निर्णय मंगळवारी जारी केला आहे.

-----------

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. १५ मे २०२५



## कै. चांदमलजी लोढा विद्यालयाची यशाची परंपरा कायम

**बीड । प्रतिनिधी**

**प्रियदर्शनी शिक्षण प्रसारक मंडळ चौसाळा ता. जि. बीड संचलित कै. चांदमलजी लोढा विद्यालयात इयत्ता दहावी फेब्रुवारी, मार्च २०२५ च्या बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन करून यंदाही निकालाची परंपरा कायम राखली.**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे यांच्यावतीने फेब्रुवारी मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल लागलेला असून आमच्या विद्यालयातील १)कुमारी हावळे अंकिता बंडू प्रथम क्रमांक २) चि. क्षीरसागर अविष्कार विजय द्वितीय क्रमांक ३) चि. तोडकर रोहन संतोष तृतीय क्रमांक सर्व विद्यार्थ्यांचे शाळेचे सचिव तथा जिल्हा परिषद सदस्य माननीय श्री अशोक शेठ लोढा साहेबांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, गावातील शिक्षक प्रेमी पत्रकार बंधू यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तसेच शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक शिक्षिका यांनी सुद्धा सर्व मुलांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# समाज कल्याण विभागाचा निधी इतरत्र वळविण्यात येऊ नये- नानासाहेब घोडके

माजलगाव । प्रतिनिधी

राष्ट्रीय चर्मकार महासंघ संस्थापक अध्यक्ष तथा माजी समाज कल्याण मंत्री बबनराव घोलप यांच्या आदेशानुसार आणि प्रदेश अध्यक्ष माधवराव गायकवाड व डॉ. शांताराम कंराडे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय चर्मकार महासंघ बीड च्या वतीने दि. १४/५/२०२५ रोजी मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री दादा अजित पवार, समाज कल्याण मंत्री संजयजी शिरसाट साहेब यांना उपजिल्हाधिकारी माजलगाव यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले की, समाज कल्याण विभागाचा निधी हा मागासवर्गीय समाजाच्या विविध योजना राबविण्यासाठी व त्या मागे मागासवर्गीय



समाजांचा सर्वांगीण विकासासाठी राखीव ठेवलेला असतो व तो देखील पुर्णपणे नसतो, या वर्षातील बराचसा निधी गेल्या महिन्यापासून इतर योजनांसाठी इतर विभागाकडे वळवण्यात आला आहे हे आम्हस वृत्तपत्र, टीव्ही व समाज कल्याण मंत्री यांच्या प्रसारमाध्यमांतील वक्तव्यावरून निदर्शनास आले आहे, त्यामुळे समाज कल्याण खात्या अंतर्गत येणाऱ्या सर्व योजनांवर त्याचा विपरीत परिणाम होणार आहे. तसेच समाज कल्याण मार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनावर त्याचा पुरोगामी परीणाम होणार आहे. समाज कल्याण खात्या मार्फत राबविण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शिष्यवृत्ती, परदेशी शिकणाऱ्या मुलांची बार्टीच्या मार्फत देण्यात येणारी शिष्यवृत्ती, आश्रम शाळा निधी, विद्यार्थी प्रशिक्षण निधी, तसेच मागासवर्गीयांच्या विविध कर्ज योजना इत्यादींवर व मागासवर्गीय समाजावर अन्याय होणार आहे. तसेच संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळ यांच्याकडून मंजूर कर्ज प्रकरणे सहभाग भरलेले कर्ज प्रकरणाचे तात्काळ वाटप करण्यात यावे.सन २०२३-२४ मधील कर्ज प्रकरणांना तात्काळ मंजुरी देण्यात यावी. तसेच बार्टी व आर्टी च्या धर्तीवर संत रोहिदास संशोधन व प्रशिक्षण संस्थेची स्थापना करण्यात यावी त्याच प्रमाणे संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळाचे पुर्ण कर्ज माफ करण्यात यावे. तरी मागासवर्गीय समाजावर होणारा अन्याय दुर करुन निधीचे वितरण पूर्ववत समाज कल्याण विभागाला करण्यात यावे अशा प्रकारे समाजकल्याण खात्याचा निधी इतर खात्यात वळविण्याच्या घटना पुढे होऊ देऊ नयेत निवेदनात करण्यात आलेल्या मागण्या मंजूर करण्यात याव्यात हि विनंती हे निवेदन राष्ट्रीय चर्मकार महासंघ जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली निवेदन देताना युवा जिल्हाध्यक्ष राजेश जाधव, जिल्हा सचिव अॅड. दत्ता जाधव, माजी कार्याध्यक्ष सत्यनारायण उनवणे, जिल्हा संघटक राधाकिसन भाळशंकर, माजलगाव तालुकाध्यक्ष सुभाष कांबळे, उद्योजक सेल तालुकाध्यक्ष मोहन त्रिमुखे, उपाध्यक्ष अर्जुन पोहेकर, सल्लागार बंडु सोनवणे, भगवान सोनवणे साहेब, पी. के. ग्रुप पद्माकर कांबळे, ज्ञानेश्वर ठोंबरे सर, सचिन वाघमारे सर, अरविंद खंडागळे, शाहादेव, संतोष खंडागळे, वसंत वाघमारे, दीपक घोगरे, विलास गवळी, सौरभ ससाने निवेदन देण्यात आले.

## न्यू व्हिजन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांची यावर्षीही १००% निकालाची परंपरा कायम

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरातील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे न्यू व्हिजन पब्लिक सी बी एस ई स्कुलचा इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी विज्ञान शाखेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून यामध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रतिवर्षा प्रमाणे यावर्षी देखील निकालाची यशस्वी परंपरा कायम राखत शाळेला १००% निकाल दिला आहे. सलग दहा वर्षां पेक्षा जास्त कालावधी पासून विद्यार्थ्यांनी १००% निकालाची यशस्वी घौडदौड कायम ठेवली आहे. न्यू व्हिजन पब्लिक स्कुल अंबाजोगाईच्या दहावी व बारावी बोर्डाचा निकाल जाहीर करण्यात आला. न्यू व्हिजन पब्लिक स्कूलने शंभर टक्के निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. इयत्ता १२ वी विज्ञान सीबीएसई शाखेत कु. पुनम दत्तात्रय चव्हाण या विद्यार्थिनीने








८९.४०% गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला आहे. कु. तेजस्विनी चंद्रकांत पांचाळ ८८.२०% द्वितीय तर कु.आकांक्षा केशव तिडके या विद्यार्थिनीने ८१.२० गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला आहे.

त्याचबरोबर इयत्ता १० वी मधे चि. अभिनव अविनाश मुंडे या विद्यार्थाने ९८.२०% गुण मिळवून शाळेतून प्रथम क्रमांक पटकावला तर चि. सार्थक रत्नेश लोहिया ९८.००% द्वितीय, तसेच चि. हर्षल हनुमंत गजबार याने ९७.२०% तृतीय क्रमांक मिळवत संस्थेचे नाव उज्वल केले आहे.

प्रतिवर्षा प्रमाणे यावर्षी ९० % च्या पुढे २२ विद्यार्थी , ८० पासून ८९ पर्यंत ३१ विद्यार्थी , ७० पासून ७९ पर्यंत ३१ विद्यार्थ्यांनी गुण प्राप्त केले . तसेच गणित या विषयात सार्थक लोहिया या विद्यार्थाने १०० पैकी १०० त्याचबरोबर या विषयात ४ विद्यार्थ्यांनी १०० पैकी १०० गुण प्राप्त केले आहेत.

अंबाजोगाई शहरात राजकिशोर मोदी यांनी मागील बावीस वर्षांपूर्वी अंबाजोगाई शहरातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता ओळखून शहरात पहिल्या सी बी एस सी शाळेची स्थापना केली. स्थापनेपासूनच विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण पुरविण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. त्यामुळेच आज ही संस्था मोठया नावरूपाला आली आहे. या संस्थेतून उत्तीर्ण झालेले अनेक विद्यार्थी विविध उच्च पदापर्यंत पोचले आहेत. या शाळेतील सर्व शिक्षक तथा प्राध्यापक वर्ग हा अतिशय मेहनतीने विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी कटिबद्ध असतो. संस्थेत केवळ शिक्षणच नाही तर विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले विविध कलागुण जोपासण्यासाठी संस्थेत शिक्षणासोबतच , क्रीडा साहित्य, त्याचबरोबर सांस्कृतिक कार्यक्रम देखील वेळोवेळी आयोजित केले जातात. त्यामुळेच विद्यार्थ्यांचा ओढा या संस्थेकडे मोठ्या प्रमाणावर असल्याचे प्रतिवर्षी दिसून येत आहे. न्यू व्हिजन पब्लिक स्कुल अंबाजोगाई शहरातील सर्व यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी , कार्यकारी संचालक संकेत मोदी , मार्गदर्शक वसंतराव चव्हाण , डॉ .डी. एच .थोरात , प्राचार्य डॉ. बी आय .खडकभावी , शाळेचे प्राचार्य रेंजू आर चंद्रन , त्याच बरोबर शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन तथा कौतुक करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## दिंद्रुडच्या खोलेश्वर विद्यालयाचा १०० टक्के निकाल

### १२० विद्यार्थ्यांपैकी ७५ विद्यार्थ्यांनी घेतले ९०% च्या पुढे गुण

दिंद्रुड प्रतिनिधी :-

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड हे शैक्षणिक भूमी म्हणून तयार होत आहे. गेल्या काही वर्षांपासून येथील खोलेश्वर विद्यालयाने विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी केलेला सार्वभौम प्रयत्न आता फळास येत आहे. यावर्षी दहावी या इयत्तेत १२० विद्यार्थी परीक्षेत बसले होते. १२० पैकी ७५ विद्यार्थ्यांनी ९०% च्या पुढे मार्क घेत दिंद्रुड व विद्यालयाचे नाव मोठे केले आहे.

संचिता मदन कदम व सिद्धी श्याम पामे या विद्यार्थिनींनी ९८.६०% घेत दिंद्रुड केंद्रातुन प्रथम येण्याचा मान पटकावला. अनुज अच्युतराव कदम व अथर्व देवेंद्र वडकर या विद्यार्थ्यांनी ९८.२०% गुण घेत केंद्रातुन द्वितीय क्रमांक पटकावला. श्रुती अनंत होरमाळे यशराज गणेश उढाण या विद्यार्थ्यांनी ९७.८०% मार्क घेत केंद्रातून तृतीय क्रमांक मिळवला. खोलेश्वर विद्यालयाचे ७५ विद्यार्थी ९० % गुण घेत शाळेतून ए+ गुणवत्तेने उत्तीर्ण झाले. यात २८ विद्यार्थ्यांनी ९५% पेक्षा जास्त गुण घेतले. उर्वरित ४५ विद्यार्थी ७०% च्या पुढे गुण घेत घवघवीत यश संपादन करत शाळेतील शैक्षणिक गुणवत्तेवर यशाचा ठसा उमटवला आहे. दिंद्रुड च्या शैक्षणिक व इतिहासात खोलेश्वर चा विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२४- २५ या कार्यकाळात सर्वाधिक गुण मिळवत उत्तीर्ण होण्याचा रेकॉर्ड केला आहे.या विद्यार्थ्यांनी भविष्यात सजग नागरिक होण्यास पात्र ठरल्या बाबत खोलेश्वर विद्यालयाच्या वतीने अध्यक्ष दिलीप पारेकर, प्राचार्या सरिता फपाळ, मुख्याध्यापक संजय रायते यांच्यासह सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

खोलेश्वर विद्यालयात शैक्षणिक दर्जा वाढवण्यासाठी परिपूर्ण प्रयत्न करत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी असल्याने शिक्षकवृंद परिश्रम घेतात. आता विद्यार्थी शिक्षकांच्या प्रयत्नांना यश मिळवत असल्याने समाधान आहे. भविष्यात माझ्या शाळेतून शैक्षणिक, सामाजिकदृष्ट्या सशक्त नागरिक बनावे हाच प्रयत्न राहील.

-दिलीप पारेकर
अध्यक्ष,खोलेश्वर विद्यालय.

## शालांत प्रमाणपत्र परीक्षेत कुलस्वामिनी भंडारे ९३.६०% गुण घेऊन उत्तीर्ण

माजलगाव । प्रतिनिधी



नुकताच माध्यमिक शालांत परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून, येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थीनी कु. कुलस्वामिनी शिवशंकर भंडारे हिने ५०० पैकी ४६५ गुण घेऊन म्हणजेच ९३.६०% गुण घेऊन उत्तीर्ण झाली आहे.

या मिळवलेल्या यशाबद्दल कु कुलस्वामिनी भंडारे हिचे भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ सुरेंद्र आलुरकर, कार्यवाह डॉ हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे पालक प्रकाश दुगड, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य अमरनाथ खुर्पे, श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी, कार्यवाह अड विश्वास जोशी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर, उपमुख्याध्यापक शैलेंद्र कंगाळे सर, पर्यवेक्षक रवींद्र खोडवे सर, सदाशिव ढगे सर, कमलाकर झोडगे सर, परमेश्वर आदमाने सर, दहावी प्रमुख नरेंद्र कोष्टगावकर, राहुल नाईक, कार्यालय प्रमुख संतोष लवडकर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

पान ६ वरून...

### विद्यार्थ्यांचे परिश्रम व शिक्षकांचे

संस्थेचे सचिव ,राजकिशोर मोदी, अध्यक्ष ,भूषण मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी मेश्राम मॅडम, वैसाका मार्गदर्शक अंकुशराव नखाते , संस्थेचे मार्गदर्शक प्रा . व्ही . बी. चव्हाण, डॉ. डी एच.थोरात, प्राचार्य बी.आय.खडकभावी, दिनकर जोशी , सी. व्ही. गायकवाड सर तसेच शाळेचे मुख्याध्यापक आनंद टाकळकर, त्याचबरोबर मतिमंद विद्यालयाचे मुख्याध्यापक ए.के. चव्हाण , अपंग विद्यालयाचे मुख्याध्यापक इंद्रकुमार लोढा, जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक विनायक मुंजे, घाटनागनाथ प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती अंजली जोशी आदींनी सर्व विद्यार्थी, पालक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

### युसूफवडगांव माध्यमिक

उत्तीर्ण झाले. शिक्षण महर्षी स्व.द.बा. घुमरे (तात्या) यांच्या प्रयत्नातून साकारलेली ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी शाळा असा नावलौकिक आजही कायम ठेवला आहे.या गुणवंत विद्यार्थ्यांना भावी आयुष्यातील शैक्षणिक वाटचालीस आणि या यशाबद्दल विद्यार्थी व शिक्षकांचे संस्था सचिव दीपक दादा घुमरे, संस्थाध्यक्ष सुकाळे सर, संस्थेचे सर्व संचालक यासोबतच प्राचार्य श्री.भोसले ए.यु. पर्यवेक्षक श्री खरबड आर.बी.आणि सर्व शिक्षकांसह सर्व ग्रामस्थ यांनी अभिनंदन व कौतुक केले आहे.

### वाढदिवसाच्या निमित्ताने ५

हार-तुरे न आणता पंतप्रधान सहाय्यता निधीला अर्थसहाय्य योगदान देण्याची विनंती केली होती. त्यानुसार अक्षय बंगल्यावर दिवसभर शुभेच्छा देणार्यांची गर्दी होती. मित्र मंडळाच्या वतीने रक्तदान शिबीर आयोजित केले. त्यात ७५ तरूणांनी रक्तदान केले. पंतप्रधान सहाय्यता निधीमध्ये शुभेच्छा देण्यासाठी येणार्या सर्वांनीच योगदानाच्या माध्यमातुन सहभाग घेतला. दिवसभरानंतर सायंकाळच्या सुमारास एकुण रक्कम जमा सुमारे ५ लाख ३७ हजार झाल्याची माहिती भाजपाचे जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांनी दिली. तसं पहाता राजकारणात वाढदिवस थाटामाटाने साजरा करण्याची फॅशन आली असताना असा एखादा तरूण नेता सामाजिक संवेदना ज्यातुन राष्ट्रभक्तीचे आदर्श निर्माण करतो, खर्या अर्थाने कौतुकास्पद म्हणावे लागेल. वाढदिवसाच्या निमित्ताने दिवसभर बंगल्यावर अक्षय मुंदडा बसुन होते. मात्र साध्या पुष्पगुच्छाचा देखील स्विकार केला नाही. वास्तविक पहाता भारताने पहेलगाममध्ये झालेल्या हल्ल्याचा ऑपरेशन सिंदुर द्वारे जबरदस्त बदला घेतला. पण युद्धजन्य परिस्थितीमुळे वाढदिवस त्यांनी साजरा केला नाही. विविध सामाजिक उपक्रम कार्यकर्त्यांनी घेतले ज्यामध्ये वृक्षारोपण, आत्महत्याग्रस्त शेतकर्यांना बियाणाचे वाटप, मधुमेह तपासणी तथा इतर कार्यक्रम. सामाजिक कार्याचे आदर्श नेतृत्वाकडून जेव्हा प्रस्थापित होतात त्यावेळी संवेदनशीलता वाढते. याच आदर्शाची पेरणी केज मतदारसंघात मुंदडा कुटुंबियांनी १९८० ते ९०च्या दशकापासून केली तोच वारसा सुपुत्राच्या माध्यमातुन पुढे सुरू झालेला दिसतो. सामान्य जनतेच्या सुखदु:खात सहभागी व्हायचं आणि गोरगरिबांची सेवा करायची हा मुळ पिंड कुटुंबियांचा आहे. वर्तमानकाळात लग्नसराईचे दिवस असल्याने आ.सौ.नमिताताई मुंदडा, जेष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा आणि अक्षय संपुर्ण मतदारसंघात लग्नाचे निमंत्रण तिथे यांचे पाऊल मोसमात नाही म्हटले तरी १५१ पेक्षा अधिक लग्न कुटुंबियांनी लावल्याचे कळते.

### साने गुरुजी माध्यमिक

तर विशेष प्रविण्यासह एकूण २४ विद्यार्थी यशवंत झाले आहेत .प्रथम श्रेणीत १५तर द्वितीय श्रेणीत ०२विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयातून सर्व प्रथम येण्याचा मान कु.

१)मदने वृषाली दत्तात्रेय९४.४०% प्रथम २)शेख आयशा अनिस९३.८०% द्वितीय ३)गायवळ गीतांजली दिनकर९३.२०% तृतीय ४)वरकड साक्षी धर्मराज ९२.६०% चौथा ५)आनेराव वैष्णवी अशोक ९२.००,% पाचवा

६) नरवडे अंकिता अंगद९१.८०% सहवा ७) शिंदे स्वराज सिद्धेश्वर९१.००% सातवा ८)काळे प्रिती संतोष९०.८०% आठवा ९) कवचट अंजली बिभिषण९०.४०% नववा १०)मदने आदिनाथ शंकर९०.००% दहावा

११) शेख आफिया सिराज८९.४०% अकरावा १२) गायवळ ज्ञानेश्वर८९.८०% बारावा १३) खरात समृद्धी बालासाहेब८९.००% तेरावा १४) वरकड ज्ञानेश्वर राजाराम८८.६०% चौदावा या यशाबद्दल व सर्व यशस्वी आणि उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक प्रा. सुशिला ताई मोराळे व अरुणा असफ अली महिला मंडळ बीड संचलितचे सचिव डॉ. अजित पाखरे श्री. शिवराज दादा पाखरे प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.तांदळे आर आर श्री.कुटे एस टी श्री.शिंदे एच के श्रीमती बडे एस डी श्रीमती.वडमारे जे एम श्री. उजगरे एस ए श्री. तारळकर ए.एम.श्री. जोगदंड एस. ए. सरपंच उपसरपंच ग्रामसेवक पालक शिक्षण प्रेमी नागरीक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले आहे. ग्रामीण भागात सातत्याने आपल्या गुणवत्ता आणि दर्जेदार व्यवस्थापन यासाठी प्रचलित शाळेचे व यशास्विताचे याप्रसंगी या निकालाबाबत संपूर्ण पंचक्रोशीतील शिक्षण प्रेमी नागरिक यांनी कौतुक व अभिनंदन केले आहे.

# सौताडा शाळेचा गेट-टुगेदर हृदयस्पर्शी ठरला

**पाटोदा । प्रतिनिधी**

**११ मे रोजी जिल्हा परिषद माध्यमिक शाळा सौताडा २००५-०६ बॅचचा आज रोजी झालेला गेट-टुगेदर अत्यंत मनाला भिडणारा ठरला, जवळजवळ ५० च्या आसपास सर्व मित्र मैत्रिणी यांना एका ठिकाणी गोळा करणे हे अत्यंत कठीण काम होते, सर्व पुढाकार घेऊन काम करणाऱ्या मित्रांनी यावर किती कष्ट घेतले असतील हे जमा झालेल्या संख्ये वरून लक्षात आले, एखाद्या लग्नाचे वऱ्हाड गोळा करावे , इतके अगदी त्याही पेक्षा, गुंतागुंतीचे काम हसत हसत पार पडणारे मित्रांचे पहिल्यांदा धन्यवाद. त्यांच्यामुळेच सर्व मित्र-मैत्रिणींना एकत्र येता आले.**

या कार्यक्रमाच्या निमित्ताने कित्येक मित्र एकोणवीस वर्षानंतरच गाठ पडले , प्रत्येक मित्रांच्या जेव्हा त्यांच्या गळ्यामध्ये पडलो, तेव्हा मन गहीवरून येणारी परिस्थिती होती, मित्रांचे हातात घेतलेले हात सोडावेसे वाटले नाहीत, किती वर्षांनी एकमेकांच्या खांद्यावरती हात ठेवून सगळ्या कार्यक्रमाचा आनंद घेतला. कार्यक्रमातील मनीषा नेमाने(काशीद)यांनी टेकाळे सरांसाठी गायलेले गीत जवळजवळ १९ वर्षानंतर पुन्हा ऐकले, मेंदूच्या खोप्यामध्ये दडलेले हे गीत पुन्हा जिवंत झाल्याची जाणीव झाली, , इतक्या भावनिक पद्धतीने या कार्यक्रमाशी जोडले जाणे ही मोठी कमाल होती.

कार्यक्रमाच्या निमित्ताने एकत्र जेवताना किती मित्रांच्या ताटामधलं कोणी काही उचलून खाल्लं, त्याचा गोडवा निराळाचं भासला, सर्वांचा डान्स अनं वैशाली मॅडम आणि अनिता यादव यांनी केलेलं सूत्रसंचालन



, संगीत खुर्ची, गायलेली गाणी, मित्रांसोबत चा डान्स , पोकळे सरांनी म्हणलेलं ''राष्ट्रगीत हे सगळं भारी होतं .. अंधार पडला तरी घराकडे जायची इच्छा नव्हती .. शेवटी अंधार पडला आणि रामेश्वर लॉन्सच्या हिवराळ गवतामध्ये.. चहा मागून सर्वांनी चहा घेतला आणि मगच सर्वजण लॉन्स मधून बाहेर पडलो

एक दिवसाची भरलेली शाळा १९ वर्षानंतर भरलेल्या वर्ग, रानमारे सरांचं लेक्चर अनं घेतलेली सर्व विद्यार्थ्यांची हजेरी बरच काही .. उन्ह दुनियाचं असताना, खालनं चटके अनं वरन उन्ह तरीही फोटो काढायची तलफ काही कमी झाली नाही .. ! एवढ्या भर उन्हात १९ वर्षानंतर मित्र-मैत्रिणींनी मिळून खेळलेला एकत्रित खो-खो आयुष्यात खूप कार्यक्रमांमध्ये, फिरलो वावरलो परंतु काही निवडक कार्यक्रमापैकी हा कार्यक्रम आयुष्यातला महत्त्वाचा कार्यक्रम ठरला.

कार्यक्रमाच्या ( १० मे रोजी ) पूर्वसंध्येला जामखेड कार्यक्रमाची खरेदी करण्यासाठी गेल्यावर आदल्या रात्री किशोर कौरे () याने अग्रहपूर्वक चारलेला नाश्ता

परत आज कार्यक्रमाच्या दिवशी पण किशोरने सर्वांना चारलेला गरम गरम वडापाव चा नाष्टा आणि जिलेबी

हा कार्यक्रम इतका भावनिक होता की; मध्यरात्री दोन वाजण्याच्या आसपास जाग येऊन या कार्यक्रमांमध्ये कोण कोण येणार असेल, शाळेतल्या सगळ्या जुन्या आठवणींनी मनाची घालमेल झाली होती. डोक्यात सगळ्या आठवणींनी गोंधळ घालायला सुरुवात केली होती.

कार्यक्रमाच्या निमित्ताने निजलेल्या खूप आठवणी पुन्हा जिवंत झाल्या .. त्यामध्ये आपला तो पूर्वीचा दहावीचा वर्ग आणि एकत्रित मिळून चे खो-खो खेळण्याची आपणच केलेली सुरुवात शाळेचे जुने मैदान, काही आपण शाळेत असतानाची झाडे पण अशीच भरलेली पाहून आनंद झाला.पुढं पाचवीला गेल्यानंतर, गणिताच्या तासाला शिकवणारे सफारी शर्टात असणारे गोऱ्या रंगाचे '' गाढवांनो'' म्हणत वजाबाकी भागाकार गुणाकार शिकवणारे आदरणीय टेकाळे सर जुन्या काळातील शर्टातील पेचे सर सर अनं सोबत हिंदी शिकवतानाची त्यांची आठवण म्हणजे त्यांचा तो एक त्या वेळेचा फेमस डायलॉग ''गधे के बच्चे''

काही विशिष्ट शिक्षक वर्गात आले की काही विशिष्ट विद्यार्थ्यांना वर्गाच्या बाहेर उभा करायचे त्याची आठवण पाऊस आला की चिंब भिजून घरी जाऊन पावसाचे कारण सांगून बुडवलेली शाळा

काही शिक्षकांची केलेली टिंगल, जी शिक्षकांना सांगितल्यानंतर टिंगल करणाऱ्याला आणि जो खरे सांगतो आहे त्यालाही केली गेलेली शिक्षा

वर्ग शिक्षकांनी मॉनेटरला सांगायचे जो कोणी बडबड करेल त्याचे नाव फळ्यावर लिहून ''माझ्याकडे नाव द्यायची जो वर्गात गोंधळ घालतंय त्याला शिक्षकांनी दिलेली शिक्षा आणि नंतर माझे नाव का लिहिले म्हणून मॉनिटर मुलींबरोबर आपल्या कित्येक वेळेस केलेली भांडण

गावडे मॅडम यांनी बऱ्याच जणांच्या हातावर मारलेल्या २० ते ४० छड्या पोकळे (नाना) सरांनी शिकवलेली एनसीसी आणि एवढ्या वर्षा नंतर राष्ट्रगीतासाठी त्यांनी नेहमी सूचना आणि गायलेले राष्ट्रगीत ऐकून मन भरून आलं अशा कित्येक आठवणीनी कार्यक्रमाच्या निमित्ताने, मनाला हिरवं करून टाकलं .. अजूनही खूप काही बोलण्यासारखे आहे पण एकच सांगतो लहानपणापासून कायम सोबत असणारे काही आपले काळजा जवळचे मित्र जसं की विजय पेचे, दत्ता सरोदे, यांना काही वैयक्तिक कारणास्तव येता आले नाही त्यामुळे त्यांना खूप मिस केले मित्रांनो तुम्ही आले असतील तर अजून पण खूप मज्जा आली असती पण असो. कार्यक्रमासाठी हॉल बुकिंग करून सिंहाचा वाटा मोलाचं सहकार्य करणारे उपसरपंच अण्णासाहेब शिंदे यांचे पण खूप खूप धन्यवाद, जेवणामध्ये सहकार्य करू मदत केल्याबद्दल रावसाहेब शिंदे यांची खूप खूप धन्यवाद, शाळेसाठी भेटवस्तू आणल्याबद्दल आणल्याबद्दल रोहिदास टेकाळे यांचे पण खूप खूप धन्यवाद, सकाळी गरम गरम नाश्ता दिल्याबद्दल किशोर कोरे यांचे खूप खूप धन्यवाद कार्यक्रमाच्या आदल्या दिवशी मदतीची गरज असताना वेळेवर येऊन सहकार्य केल्याबद्दल अमोल भाऊ पेचे,गणेश पेचे यांचे पण खूप खूप धन्यवाद चंद्रकांत शिंदे, ज्ञानेश्वर शिंदे सर्वांचेच खूप खूप धन्यवाद प्रत्येकाचे नाव घेऊ शकत नाही सर्वांनी मोलाचे सहकार्य करून हा कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल सर्वांचे मनस्वी आभार

# अवकाळी पावसाचं थैमान; केळी, मिरची, डाळिंब, ऊस, कांदा पिकाचं नुकसान; १२ जनावराचा मृत्यू

राज्यावर सध्या अवकाळी पावसाचं संकट आहे. सोमवारी ठाणे, मुंबईसह राज्यात अनेक भागात अचानक जोरदार पावसाने हजेरी लावली. यामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. तर राज्यात काही भागात मागील सलग दोन ते तीन दिवसांपासून अवकाळी पाऊस सुरु असल्याचं चित्र आहे. यामुळे शेतीपिकांसह, बागायतदारांचंही मोठं नुकसान झालं आहे. केळी, मिरची, डाळिंब, ऊस, कांदा या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. काही ठिकाणी जनावरांचाही मृत्यू झाला आहे.

**तीन एकर केळीची बाग भूईसुपाट**

पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील मांडवगण फराटा गावातील शेतकरी राजेंद्र मारूती घाडगे यांची अवकाळी पावसाने तीन एकर केळीची बाग भूईसुपाट झाली. तीन एकरांमधे त्यांनी एकूण तीन हजार पाचशे केळीची झाडे लावली होती. या झाडांना सध्या केळीचे घडही लागले होते. मात्र अचानक आलेल्या पावसाने हे सगळं जमीनदोस्त झालंय. या अवकाळी पावसाने त्यांचं १३ लाख रुपयांचं नुकसान झाल्याचं त्यांनी सांगितलं आहे. पुणे जिल्ह्यात अवकाळी पावसाने केळी, ऊस, डाळिंब, कांदा या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शासनाने नुकसानीचे पंचनामे सुरू केलेले नाहीत. त्यामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेऊन नुकसान भरपाई देण्याची शेतकऱ्यांची मागणी आहे.

**दहा एकर केळीची बाग जमीनदोस्त**

सांगवी आष्टी गावातील येथील वादळी वाऱ्याने दहा एकर केळीची बाग जमीनदोस्त झाली आहे. अधिकारी शेतकऱ्यांना उडवा-उडवीची उत्तर देतात. आष्टी तालुक्यातील सांगवी आष्टी येथील शेतकरी रमेश गायकवाड, किसान गायकवाड,



नानासाहेब खेडकर, दत्तात्रय खेडेकर,सोमीनाथ खेडकर, सौरभ खेडकर, मधूकर खेडकर या शेतकऱ्यांच्या केळीची बाग वादळी वाऱ्यासह उद्ध्वस्त झाली, यामुळे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून अधिकारी गावात येऊन पंचनामे न करता शेतकऱ्यांना उडवा-उडवीचे उत्तर देतात, यामुळे शेतकरी हाताश झाले आहेत. निसर्गही कोपला, अधिकारी चांगली वागणूक देत नाहीत, तर न्याय मागायचा कुणाकडे असा प्रश्न आता शेतकऱ्यांना पडला आहे.

**अवकाळी पावसानं लाखो रुपयांची मिरची सडली**

भंडारा जिल्ह्यात धान पीक हे मुख्य उत्पादन असलं तरी आता नगदी पीक म्हणून अनेक शेतकरी बागायती शेतीच्या माध्यमातून मिरचीचं उत्पादन घेऊ लागले आहेत. मागील आठवड्यात भंडारा जिल्ह्याला अवकाळी पावसानं अक्षरश: झोडपून काढलं. या अवकाळी पावसामुळं भात पीक जमीनदोस्त झालं. तर, पालेभाज्यांच्या शेतीलाही मोठा फटका बसला.

तर मिरची पिकांनाही नुकसान झाल्याचं चित्र भंडारा जिल्ह्यात बघायला मिळालं. ज्या मिरची उत्पादकांनी मिरचीचं उत्पादन घेतलं किंवा त्या मिरची विक्रीतून ज्या व्यापाऱ्यांनी व्यवसाय करण्याकरिता मिरची खरेदी केली, अशांना या अवकाळी पावसाचा जबर फटका बसला. किंबहुना पावसामुळं मिरची सडली आणि आता या मिरचीला मार्केटमध्ये दर ही मिळणार नाही, अशी भीती आता व्यक्त होत आहे. छोटे व्यापारी किंवा शेतकऱ्याचा विचार केल्यास या अवकाळी पावसामुळं त्यांना पाच ते दहा लाख रुपयांचा फटका बसल्याचं बघायला मिळत आहे.

जोरदार पावसामुळे ऐन उन्हाळ्यात बेनीतुरा नदी प्रवाहीत, १२ जनावरांचा मृत्यू : मागच्या दोन दिवसांत धाराशिव जिल्ह्याच्या काही ग्रामीण भागाला अवकाळी पाऊस, वादळी वारे अन्? विजांच्या कडकडाटाचा जोरदार फटका बसला आहे. उन्हाळ्याच्या दिवसात उमरगा तालुक्यातील बेनीतुरा नदीला पुराचे स्वरूप आले. अवकाळी पावसामुळे ऐन उन्हाळ्यात बेनीतुरा नदी प्रवाहित झाल्याचा व्हिडीओ सर्वत्र व्हायरल होत आहे. धाराशिव, उमरगा, लोहारा तसेच कळंब तालुक्यातील गावांतील उन्हाळी पिकांचे, फळबागांचे मोठे नुकसान झाले आहे. १० गावांना विजांचा फटका बसला आहे. याचा मोठा तडाखा पशुपालकांना बसला असून पावसाच्या थैमानात १२ जनावरांचा बळी गेला आहे. प्रशासनाने लवकरात लवकर पंचनामे करून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत द्यावी, अशी मागणी आता शेतकऱ्याकडून होत आहे.

भंडाऱ्यातही अवकाळी पावसाची हजेरी

हवामान विभागानं १५ मेपर्यंत अवकाळी पावसाचा अंदाज वर्तविला आहे. दोन दिवसांच्या विश्रांतीनंतर मध्यरात्री पुन्हा एकदा भंडाऱ्यात अवकाळी पावसानं हजेरी लावली आहे. मागील दोन दिवसांपासून उन्हाची प्रखरता जाणवू लागली असता, सोमवारी अचानक आलेल्या या पावसानं नागरिकांची होणाऱ्या उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळाला आहे. मागील आठवड्यात झालेल्या जोरदार अवकाळी पावसानं भंडारा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचं प्रचंड नुकसान झालेलं असून त्याच्या नुकसानीचे पंचनामे तातडीनं करण्याचे निर्देश जिल्हा प्रशासनानं दिले आहेत.




### महत्वाच्या घटना

१७१८ : जगातल्या पहिल्या मशीन गन बंदूकेचे पेटंट जेम्स पक्कल यांनी घेतले.
१७३० : रॉबर्ट वॉल्पोल युनायटेड किंग्डमचे पहिले पंतप्रधान झाले.
१८११ : पॅराग्वेला (स्पेनकडून) स्वातंत्र्य मिळाले.
१८३६ : सूर्यग्रहणातील खग्रास स्थितीपुर्वी दिसणार्या 'बेलीज बीड्?स'चे शास्त्रज्ञ फ्रॅन्सिस बेली यांनी सर्वप्रथम निरीक्षण केले.
१९०५ : अमेरिकेतील नेवाडा राज्यात सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या वेगास शहराची स्थापना करण्यात आली.
१९२८ : मिकी माऊस कार्टून प्लेन क्रेजी या शो मधून पहिल्यांदा प्रसारित केले गेले.
१९३५ : मॉस्को शहरात भुयारी रेल्वेची सुरूवात झाली.
१९४० : सॅन बर्नाडिनो, कॅलिफोर्निया येथे 'मॅक्डोनाल्डस'चे पहिले उपहारगृह सुरू झाले.
१९४० : दुसरे महायुद्ध हॉलंडने जर्मनीसमोर शरणागती पत्करली.
१९५८ : सोव्हिएत युनियनने स्पुतनिक ३ चे प्रक्षेपण केले.
१९६० : सोव्हिएत युनियनने स्पुतनिक ४ चे प्रक्षेपण केले.
१९६१ : पुण्याच्या चतु:शृंगी वीजकेंद्रात प्रचंड स्फोट होऊन ९ जणांचा मृत्यू
१९८० : संपूर्ण भारतीय बनावटीच्या गोदावरी या पाणबुडीचे माझगाव गोदीमध्ये जलावतरण.
१९९३ : संयुक्त राष्ट्राच्या सदस्य राष्ट्रांनी १५ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय परिवार दिवस म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला.
२००० : दक्षिण काश्मीरच्या अनंतनाग जिल्ह्यातील मंडीपुरा येथे अतिरेक्यांनी पेरलेल्या भूसुरुंगाच्या स्फोटात जम्मू काश्मीरचे ऊर्जा राज्यमंत्री गुलाम हसन बट यांच्यासह ५ जण ठार

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१७ : देवेंद्रनाथ टागोर, बंगाली समाजसुधारक.
१८५९ : पिएर क्युरी, फ्रेंच भौतिकशास्त्रज्ञ.
१८९२ : भारतीय वकील व पुणे विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि राजकारणी तसचं, भारतीय लोकसभा मतदार संघाचे सदस्य आणि मध्य प्रदेशचे माजी राज्यपाल हरि विनायक पाटसकर यांचा जन्मदिन.
१९०३ : रा. श्री. जोग साहित्य मीमांसक, कवी व विचारवंत (मृत्यू: २१ फेब्रुवारी १९७७)
१९०७ : 'सुखदेव' थापर क्रांतिकारक (मृत्यू: २३ मार्च १९३१)
१९१४ : तेनसिंग नोर्गे, एव्हरेस्ट वर प्रथम चढाई करणार्या एडमंड हिलरी यांचे सहकारी.
१९२६ : माजी भारतीय नौदल अधिकारी महेंद्रनाथ मुल्ला यांचा जन्मदिन.
१९६७ : माधुरी दिक्षीत-नेने अभिनेत्री

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१३५० : संत जनाबाई.
१७२९ : वैशाख व. १४, शके १६५१ मराठेशाहीच्या आपत्?प्रसंगी पराक्रम गाजवणारे खंडेराव दाभाडे यांचे निधन.
१९५८ : मुगल राजघराण्यातील प्रमुख भारतीय इतिहासकार यदुनाथ सरकार यांचे निधन.
१९९३ : फील्डमार्शल के. एम. करिअप्पा स्वतंत्र भारताचे पहिले लष्करप्रमुख (जन्म: २८ जानेवारी १८९९)
१९९४ : पी. सरदार, चित्रकार व दिनदर्शिका चित्र निर्माता.
१९९४ : ओम अग्रवाल जागतिक हौशी स्नूकर अजिंक्यपद स्पर्धेतील एकमेव भारतीय विजेता
२००० : सज्जन जुन्या जमान्यातील चित्रपट व नाट्य अभिनेते. तलाक (१९५८), बीस साल बाद (१९६२)
२००३ : अमेरिकेतील प्रसिद्ध गायिका जून कार्टर यांचे निधन
२००७ : लिबर्टी विद्यापीठाचे स्थापक जेरी फेलवेल यांचे निधन. (जन्म: ११ ऑगस्ट १९३३)
२०१० : भारताचे ११ वे उपराष्ट्रपती व राजस्थान राज्याचे माजी मुख्यमंत्री भैरोसिंह शेखावत यांचे निधन.

# जाणून घ्या कालवडीचे योग्य संगोपन कसे करावे

आजची कालवड उद्याची गाय असते. चांगले व उच्च दूध उत्पादन मिळण्यासाठी सध्या प्रत्येक दूध उत्पादक शेतकरी धडपड करत आहे. आपल्याकडे असलेल्या गाई वेळेवर हीटवर आणणे, त्यांचे कृत्रिम रेतन करणे. उच्च दर्जाची लिंगवर्धित रेतन कांडी द्वारे त्या गाईपासून चांगल्या शरीर रचनेची व अधिकतम दूध उत्पादन देणारी कालवड जन्मला येणे यासाठी सर्व शेतकरी प्रयत्न करत आहे. मात्र, यातून एक चांगली कालवड निर्माण होत नसून, त्यात पुढील टप्प्यातील कालवड संगोपन होणे अपेक्षित असते.

एक चांगली गाय तयार होण्यासाठी वासरांना बॉटल फिडिंग (बॉटल द्वारे दूध पाजणे), कॉल्फ स्टार्टर, जंतनिर्मूलन, लसीकरण, सकस पोषक आहार देणे देखील गरजेचे आहे. ज्यामुळे भविष्यात कालवडींच्या रोगप्रतिकार शक्तीत वाढ होते. सदृढ कालवड ते उच्च दूध उत्पादक गाय निर्माण करण्याचा आपला मानस पूर्ण होतो. तसेच यामुळे पशुपालकांना अधिकचा आर्थिक फायदा होतो.

'या' गोष्टी आहेत महत्वाच्या : बॉटल फिडिंग : पूर्वीपासून आपल्याकडे वासरांना गाईच्या कासेला लावून दूध पाजले जाते. मात्र, असे दूध पाजताना बऱ्याचदा ही वासरे गाईंच्या कासेला इजा पोहचवितात. तसेच वासरू किती दूध पीत आहे. हे आपल्याला माहित नसते. मात्र, याउलट जेव्हा बॉटलद्वारे



दूध पाजले जाते. तेव्हा आपण मोजमाप केलेले वजनानुसार वासरांच्या शरीराला आवश्य तेवढेच दूध पाजू शकतो.

काल्फ स्टार्टर : काल्फ स्टार्टरमध्ये विविध गुणधर्माचा खनिजांचे मिश्रण असते. तसेच लहान वासरांची वाढ होण्यासाठी लागणाऱ्या घटकांची पूर्तता असते. ज्यामुळे वासरांची झपाट्याने वाढ होण्यास मदत होते.जंतनिर्मूलन : बऱ्याच वेळी लहान वासरे माती खातात. ज्यामुळे त्यांच्या शरीरात जंत तयार होत असतात. या जंतांचे वेळीच निर्मूलन झाले नाही तर वासरांची वाढ खुंटते, पोट सुटते आदी लक्षणे दिसून येत असतात.

यासाठी जवळील पशुवैद्यकाच्या सल्ल्याने वेळच्या वेळी जंतनिर्मूलन करणे गरजेचे असते. लसीकरण : लसीकरण हा एक खुप महत्वाचा टप्पा आहे. ब्रुसोलिसिस, लाळ खुरकत, लंपी, आंतरविषार, आदी विविध आजरांचे लसीकरण आपण आपल्या लहान मोठ्या जनावरांना वेळच्या वेळी करायला हवेत ज्यामुळे भविष्यात मोठी आर्थिक हानी टळते. एक वर्षाच्या आतील वासरांना ब्रुसोलिसिस ही लस देण्यात येत असते. सकस पोषक आहार : योग्य प्रमाणात सुका आणि हिरवा चारा जनावरांना त्यांच्या रोजच्या आहारात मिळाला तर बरेच आजार व समस्या तिथे दूर होतात. मात्र अनेकदा आपण बुरशी आलेला, काळा पडलेला चारा जनावरांना देतो ज्यामुळे ते आजारी पडतात.

# नॅनो युरियामुळे शेतकऱ्यांना होतोय मोठा फायदा




रासायानिक खतांच्या अतिवापरामुळे जमिनीचा पोत खराब होत चालला आहे. याचा परिणाम पिकांच्या उत्पादनावर देखील जाणवू लागला आहे. शेतीत रसायनांचा अतिवापर माती, हवा आणि पाण्याचे नुकसान करत आहेत. या पर्याय म्हणून नॅनो युरियासारख्या नॅनो खतांचा वापर वाढविण्यास सरकार आग्रही आहे. मात्र नॅनो खतांबद्दल शेतकऱ्यांमध्ये अजूनही संभ्रम दिसून येत आहे. तज्ज्ञांनी केलेल्या वेगवेगळ्या प्रयोगांनुसार, नॅनो युरियामुळे युरियाचा वापर कमी होऊन उत्पादनात वाढ झाल्याचे दिसून आले.

नॅनो युरियाच्या मूल्यमापनासाठी आयसीएआर आणि राज्य कृषी विद्यापीठांच्या संशोधन संस्थांद्वारे नॅनो युरियाच्या चाचण्या घेण्यात आल्या आहेत. या चाचण्यांद्वारे पीक उत्पादकता, खतांच्या डोसमध्ये कपात, शेतकऱ्यांचा नफा अशा विविध पैलूंवर लक्ष देण्यात आले आहे. सरकारचा दावा आहे की वेगवेगळ्या ठिकाणी आणि कृषी-हवामान झोनमध्ये नॅनो युरिया-लिक्विडच्या वापराच्या परिणामांवरून असे दिसून आले आहे की तांदूळ, गहू, मका, टोमॅटो, काकडी आणि सिमला मिरची यांसारख्या पिकांच्या गंभीर वाढीच्या टप्प्यावर नॅनो युरिया फायदेशीर ठरला आहे. त्यामुळे उत्पन्न वाढते. नॅनो युरियाबाबत पसरवण्यात येत असलेल्या संभ्रमावर केंद्र सरकारने आपली भूमिका यापुर्वीच स्पष्ट केली आहे. संपूर्ण चाचणीनंतरच देशात नॅनो युरियाचा वापर सुरू करण्यात आल्याचे केंद्राने म्हटले आहे. त्यामुळे खतांचा वापर कमी होऊन उत्पादनात वाढ होते. केंद्रीय खते समितीने (सीएफसी) डेटाच्या आधारे आणि जैवतंत्रज्ञान विभागाशी (डीबीटी) सल्लामसलत केल्यानंतर याची शिफारस केली आहे. कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने देखील या संदर्भात डेटा आणि योग्य विचाराच्या आधारे शिफारस केली आहे.

# चवळीचे जास्तीचे उत्पादन घेण्यासाठी हे करा



महाराष्ट्रात चवळी मिश्र पीक म्हणून घेतळे जाते तर काही ठिकाणी पट्टे पध्दतीने लागवड केली जाते. अलिकडे मोठ्या शहरांच्या जवळपास भाजीच्या चवळीची ळागवड व्यापारीदृष्ट्या केली जाते. उन्हाळी पिकाची लागवड जानेवारी- मार्च तर खरीप हंगामात जून- जुलै महिन्यात करतात. तसेच बागायती पीक म्हणून हे पीक घेता येते.

प्रकार : सर्वसाधारणपणे चवळीचे तीन प्रकार आढळून येतात : १) लांब शेंगांची चवळी : यालाच बाली किंवा यार्डबीन म्हणतात, झाडे वेलीसारखी वाढतात. शेंगांची लांबी ३० ते ९० सें.मी. पर्यंत असते.

२) गोल शेंगाची चवळी : या प्रकारात शेंगांची लांबी ७ ते १२ सें.मी. पर्यंत असते. बिया आकाराने लहान असतात.

३) सर्वसाधारण चवळी : ही झाडे बुटकी ते मध्यम आकाराची असतात. काही जाती वेलीसारख्या वाढतात.

जमिनीच मशागत : चवळी लागवडीपूर्वी जमीन नांगरून, कुळवून भुसभुशीत करावी व त्यात हेक्टरी १५ ते २० टन शेणखत मिसळावे. त्यानंतर सोयीनुसार वाफे किंवा सर्या पाडाव्यात व बी टाकावे. दोन ओळीतील अंतर ४५ ते ६० सें. मी. ठेवावे आणि विरळणी करून दोन रोपात २० ते ३० सें. मी. अंतर ठेवावे. हेक्टरी १५ ते २० किलो बी लागते.

सुधारित जाती : १) कोकण सफेद : ही जात ७५ ते ८० दिवसात येणारी असून तिला हिरबी गार पालवी व पांढऱ्या रंगाची फुले येतात. शेंगा खालच्या अर्धा भागापर्यंत लागतात. ही जात विषाणूजन्य रोगास प्रतिकारक आहे. या जातीपासून १४ क्विंटलपर्यंत हेक्टरी उत्पादन मिळते. २) कोकण सदाबहार : ही जात बुटकी असून लबकर तयार होते. शेंगा व पाने हिरव्या रंगाची असून लवकर येणारी उपयुक्त जात आहे. या जातीपासून १३ ते १४ क्विंटलपर्यंत उत्पादन मिळते. ३) पुसा- दो-फसली : ही जात उन्हाळी ब पाबसाळी या दोन्ही हंगामात घेता येते. झाडे झुडूपबजा वाढणारी असून शेंगाची लांबी १८ ते २० से.मी. पर्यंत असते. या जातीपासून ८० ते १०० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळते. ४) अको गरीमा : या जातीच्या शेगांची लांबी २० ते २५ सें.मी. असून जाडी इतर चवळीच्या प्रचलित जातीच्या शेंगांपेक्षा जास्त असते. शेंगेत गराचे प्रमाण जास्त असल्याने भाजीसाठी ती जात उत्तम आहे. हेक्टरी १२० ते १५० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळते. ५) पुसा कोमल : या जातीच्या शेगांची लांबी २० ते २२ सें.मी. पर्यंत असून, रंग हिरवा असतो. दाणा पांढरा, गोळ, लांबट आणि जाडा असल्याने उसळीसाठी ही जात चांगली आहे. शेंगांचे हेक्टरी उत्पादन १०० ते ११० क्विटलपर्यंत मिळते. ६) पुसा फाल्गुनी : शेंगा गडद -हिरव्या रंगाच्या १२ ते १५ सें.मी. लांब असतात. लागवडीपासून ६० दिवसात शेंगा काढणीस तयार होतात. हेक्टरी ८० ते ९० क्विटलपर्यंत उत्पादन मिळते. ७) पुसा बरसाती : ही जात खरीप हंगामासाठी उपयुक्त आहे. शेंगेची लांबी २० ते २५ सें.मी. पर्यंत असते. ही जात लागवडीपासून ४५ दिवसात काढणीला तयार होते. हेक्टरी ७५ ते ८० क्विंटलपर्यंत उत्पादन मिळते.

# लोकशाहीचा उत्सव साजरा होत असतानाच पिंपरनई गावावर शोककळा

## विद्युत प्रवाहाच्या धक्क्याने विवाहितेचा मृत्यू

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पिंपरनई येथे काल दि.१३ सोमवार रोजी लोकसभेच्या पार्श्वभूमीवर मतदान सुरू असतानाच दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास यमुना अनिल आमटे वय ३३ वर्षे या विवाहितेचा घरात विद्युत प्रवाह उतरल्याने विजेच्या धक्क्याने जागीच मृत्यू झाला आहे. एकीकडे गावात लोकशाहीचा उत्सव साजरा करत असतानाच घडलेल्या दुर्दैवी घटनेने गावावर शोककळा पसरली असुन घटनेनंतर मतदान केंद्रावर शुकशुकाट होता.गरीब ऊसतोड मजुरांच्या कुटुंबातील व्यक्तींचा मृत्यू झाल्याने परीसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. यमुना आमटे यांना पृथ्वीराज व प्राची नावाची १२ वर्षे वयाची जुळी मुले आहेत.आनिल ऊसतोडणीसाठी बाहेर गावी गेल्यानंतर ही घटना घडली.यमुनाबाई यांच्या आई शकुंतला लक्ष्मण वायभट या शेतातुन दुपारी घरी आल्यानंतर त्यांना यमुनाबाई बेशुद्ध पडलेल्या दिसल्या.हात लाऊन उठवण्याचा प्रयत्न केला असता त्यांना करंट बसल्यानंतर त्यांनी आरडाओरड केल्यानंतर शेजारी जमा झाले.वायर तोंडुन त्यांना बीड येथील रूग्णालयात नेण्यात आले परंतु त्यापुर्वीच डॉक्टरांनी मृत घोषित केले.

पिंपरनई गावात एकुण ९३७ मतदान असुन काल दुपारी ३ वाजेपर्यंत ७१३ मतदान केल्याची नोंद होती.दुपारी ३ वाजता एकच आरडाओरडा




झाल्याने यमुना आमटे यांना घेऊन बीड येथील रूग्णालयात नेण्यात आले परंतु तोपर्यंत मृत्यू झाला होता. दुर्दैवी घटनेनंतर मतदान केंद्राकडे कोणीही फिरकले नाही. सर्वैतोपरी मदत महावितरण कडुन केली जाईल घडलेली घटना अत्यंत दुर्दैवी असु आज तालुकास्तरीय अधिकारी पिंपरनई येथे घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करणार आहेत व महावितरण कडुन सर्वोतोपरी मदत करण्यात येईल.असे आश्वासन लिंबागणेश येथील महावितरणचे उपअभियंता हुलकुडे यांनी दिले आहे. यमुना आमटे या ऊसतोड मजुर असुन त्यांच्या नावावर २ एकर कोरडवाहू शेती असुन गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजनेतुन शेतकऱ्यांच्या अपघाती मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबियांस २ लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य दिलं जाते त्या योजनेअंतर्गत यमुनाबाई यांच्या लहान जुळ्या मुलांच्या भवितव्यासाठी आर्थिक सहाय्य करण्यात यावे.अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी तहसीलदार,मंडळ अधिकारी, तलाठी केली आहे.

## काकू-नाना प्रतिष्ठान यांच्यावतीने योग महोत्सव

बीड । प्रतिनिधी

जागतिक योग दिन २१ जून २०२४ च्या अनुषंगाने काकू-नाना प्रतिष्ठान, पतंजली योग समिती बीड, सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकिय महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ९ व्या जागतिक योग दिनानिमित्त दिंडी आपल्या दारी हे अभियान दिनांक १५ मे पासून ते २१ जून २०२४ पर्यंत राबवण्यात येणार आहे.

आठ वर्षापासून बीड शहरवासीयांचे आरोग्य अबाधित राहण्यासाठी काकू-नाना प्रतिष्ठान, पतंजली योग समिती बीड व सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकिय महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने योग दिंडी आपल्या दारी हे अभियान बीड शहरातील विविध प्रभागात राबवण्यात येणार आहे.प्रत्येक प्रभागासाठी.. प्रभागातील प्रत्येकासाठी.. योग दिंडी आपल्या दारी अभियान. २०१४ पासून २१ जुन हा जागतिक योग दिन म्हणून मानण्यात येत आहे. पहिल्या जागतिक योग दिनानिमित्त बीड शहरात ७५ दिवसांची योग दिंडी राबवण्यात आली. २०१५ साली १०१ दिवसाची योग दिंडी राबवण्यात आली व २०१६ पासून ३६५ दिवसांची योग दिंडी बीड शहरात अविरत चालू आहे. यावर्षीची योग दिंडीची सुरुवात दिनांक १५ मे पासून सुरू होत आहे. शिबीर क्रमांक १ सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकिय महाविद्यालय बीड दिनांक १५ मे ते २० मे २०२४ पहाटे ५ ते ७ या वेळेत संपन्न होणार आहे. शिबिर क्रमांक: २ पारस नगरी माने कॉम्प्लेक्स



बीड. दिनांक :२१ मे ते २७ मे २०२४ शिबिर क्रमांक: ३ शासकीय आय.टी.आय. जवाहर कॉलनी बीड. दिनांक: २८ मे २ जून २०२४ शिबीर क्रमांक: ४ मौजकर यांचे टर्फ विकेट, जिजामाता चौक, जानवळे हॉस्पिटलच्या समोर. दिनांक ३ जून ते ७ जून २०२४. शिबिर क्रमांक: ५ छत्रपती संभाजी राजे क्रीडांगण (मल्टीपर्पज ग्राउंड) बीड. दिनांक ८ जून ते १४ जून २०२४. शिबिर क्रमांक ६: आशीर्वाद लॉन्स बार्शी रोड बीड. दिनांक १५ जून ते २१ जून २०२४. सर्व शिबिरांसाठी वेळ एकच राहील पहाटे ५.०० ते ७.००. ह्या पद्धतीने योग दिंडीचे स्वरूप राहणार आहे. या योग दिंडीचा लाभ सर्व बीड शहरवासीयांनी घ्यावा असे आवाहन माजी मंत्री जयदत्तजी आण्णा क्षीरसागर, बीड जिल्हा पतंजलीचे सर्वेसर्वा ॲड. श्रीराम लाखे व पतंजली योग समितीचे सर्व जिल्हा पदाधिकारी व योगशिक्षक यांनी केले आहे.

## न्यू व्हिजन पब्लिक स्कुलचा मंदार धनराज कदम बीड जिल्ह्यात अव्वल



न्यू व्हिजन पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांची १००% निकालाची परंपरा कायम राखत यशस्वी घोडदौड

अंबाजोगाई। प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील श्री बालाजी श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे न्यू व्हिजन पब्लिक सी बी एस ई स्कुलचा इयत्ता १० वीचा निकाल नुकताच जाहीर झाला असून यामध्ये शाळेच्या विद्यार्थ्यांनी निकालाची यशस्वी परंपरा कायम राखत शाळेचा १००% निकाल लावला आहे. सलग अनेक वर्षांपासून १००% निकालाची यशस्वी घौडदौड कायम ठेवली आहे. गुणवंत तथा यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक राजकिशोर मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी, प्रा वसंत चव्हाण, प्रा दामोदर थोरात, प्राचार्य रेंजो आर चंद्रन यांनी अभिनंदन करत पुढील शिक्षणासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

न्यू व्हिजन पब्लिक सीबीएसई स्कुल अंबाजोगाईच्या दहावी बोर्डाचा निकाल जाहीर करण्यात आला. यामध्ये ९९% गुण घेऊन बीड जिल्ह्यातून सर्व द्वितीय तर अंबाजोगाईतून सर्वप्रथम येण्याचा मान चि.मंदार धनराज कदम या विद्यार्थ्यांने पटकवला. न्यू व्हिजन पब्लिक स्कूल या शाळेने शंभर टक्के निकालाची परंपरा कायम ठेवत ९०% च्या पुढे २० विद्यार्थी, ८० पासून ८९ पर्यंत २५ विद्यार्थी, ७० पासून ७९ पर्यंत २० विद्यार्थ्यांनी गुण प्राप्त केले . तसेच संस्कृत या विषयात १३ विद्यार्थी १०० पैकी १००, मराठी या विषयात एका विद्यार्थ्याने १०० पैकी १००, तसेच गणित या विषयात ०२ विद्यार्थी १०० पैकी १०० गुण प्राप्त केले . राजकिशोर मोदी यांनी अंबाजोगाई शहरात मागील वीस बावीस वर्षांपूर्वी अंबाजोगाई शहरातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता ओळखून शहरात पहिल्या सी बी एस सी शाळेची स्थापना केली. स्थापनेपासून उच्च दर्जाचे शिक्षण पुरविण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. त्यामुळेच आज ही संस्था मोठया प्रमाणावर नावरूपाला आली आहे. या संस्थेतून उत्तीर्ण झालेले अनेक विद्यार्थी विविध उच्च पदापर्यंत पोचले आहेत. या शाळेतील सर्व शिक्षक तथा प्राध्यापक वर्ग हा अतिशय मेहनतीने विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी कटिबद्ध असतात. संस्थेत केवळ शिक्षणच नाही तर विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले विविध कलागुण जीपासण्यासाठी शिक्षणासोबतच, क्रीडा साहित्य, त्याचबरोबर सांस्कृतिक कार्यक्रम देखील वेळोवेळी आयोजित करण्यात येतात. त्यामुळेच विद्यार्थ्यांचा ओढा संस्थेकडे मोठ्या प्रमाणावर असल्याचे प्रतिवर्षी दिसून येत आहे. न्यू व्हिजन पब्लिक स्कुल अंबाजोगाई शहरातील सर्व यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी, मार्गदर्शक वसंतराव चव्हाण, डॉ. थोरात, खडकभावी, शाळेचे प्राचार्य रेंजू आर चंद्रन, त्याच बरोबर शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन तथा कौतुक करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## धारूर शहरात संभाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

धारुर । प्रतिनिधी

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी धारुर शहरात छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली ट.

शहरातील तांदळवाडी रोड येथे संभाजी महाराज चौकात संभाजी महाराज यांच्या प्रतिमे पुजन करुन छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. छत्रपती संभाजी महाराज चौक किल्ले धारुर येथे १४ मे रोजी संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करुन मोठ्या उत्साहा साजरी करण्यात आली.

यावेळी माजी नगराध्यक्ष स्वरुपसिंह हजारी नगरसेवक संजित कोमटवार,कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सुनिल शिनगारे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सिध्देश्वर रंदवे,राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष नितिन शिनगारे,सुरेश गवळी,विनायक शिनगारे,डॉ.भागवत शिनगारे,संचालक संदिप शिनगारे, शिवभक्त प्रतिष्ठाचे अध्यक्ष विश्वास शिनगारे,अॅड.परमेश्वर शिनगारे,नितिन भाई शिनगारे,नागेश





शिनगारे,मनसे तालुकाध्यक्ष प्रशांत शिनगारे,सुदर्शन शिनगारे,विजय शिनगारे, पत्रकार अतुल शिनगारे,सचिन थोरात,इश्वर खामकर,ज्ञानेश्वर शिंदे,सोनु फुके,बापु खामकर,शिवराज शिनगारे,सनी शिनगारे,अविनाश ठोंबरे, कृष्णा उकंडे,युवा मोर्चा अॅड. मोहन भोसले,अजित शिनगारे,धनंजय शिनगारे,निलेश शिनगारे, इंजि. जनक फुन्ने,अंकुश कदम,अशोक कुरवडे,भैय्यासाहेब साखरे,संकेत शिनगारे,सागर इखे,निलेश शिनगारे,शुभम निकते,प्रसाद शिनगारे,अमित शिनगारे,बालाजी शिनगारे,राहुल शिनगारे,गणेश साखरे,शाम फावडे,सह आदी नागरिक उपस्थित होते.

## कट्टे ऑर्थोपेडीक हॉस्पीटलमध्ये हाडांसाठी भव्य मोफत शिबिर

बीड । प्रतिनिधी

येथील कट्टे ऑर्थोपेडीक हॉस्पीटलमध्ये हाडाची ठिसुळता (ऑस्टिओपोरोसीस) मोफत तपासणी शिबीर गुरुवार १६ मे २०२४ रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ वाजेपर्यंत आयोजीत केले आहे त्याचा लाभ घेण्याचे आवाहन कट्टे ऑर्थोपेडीक हॉस्पीटलमध्ये वतीने करण्यात आले आहे.

पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, हाडाची ठिसुळता (बीएमडी) ही वयाच्या चाळीशीनंतर स्त्री व पुरुष या दोघांमध्ये आढळते. हाडाची ठिसुळता म्हणजे हाडांतील कॅल्शिअम कमी होवून हाडे ठिसुळ व कमकुवत बनतात आणि यामुळे पुढे वरचेवर फ्रॅक्चर व सांधेदुखीचे वयाबरोबर वाढलेले प्रमाण वाढते. स्त्रीयांना रजोनिवृत्तीनंतर वाढत्या वयाबरोबर हाडातील कॅल्शिअमचे प्रमाण ३० ते ४० टक्केपर्यंत कमी झालेले आढळते. हाडाची ठिसुळता याच्याकरिता उपचार पद्धती उपलब्ध आहेत. बाहेर इतरत्र ठिकाणी या तपासणीसाठी १५०० ते २००० रुपये खर्च येणारी ही तपासणी मोफत असून या सुवर्णसंधीचा लाभ घेवून आपल्याला भविष्यात होणार्या हाडांच्या आजारावर मात करण्यासाठी मात करण्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक कट्टे ऑर्थोपेडीक हॉस्पीटलकडून करण्यात आले आहे.

## डॉ.विठ्ठल जाधव राज्यस्तरीय साहित्य पुरस्काराने सन्मानित

बीड । प्रतिनिधी

पुस्तके वाचतानाच माणूसदेखील वाचता यायला हवा. त्याने शहाणपण येते तर आजच्या राजकीय पातळीचा विचार करता प्रगल्भ लोकशाहीसाठी लेखक, कलाकार यांची जबाबदारी वाढली आहे असे प्रतिपादन विवेकवादी विचारवंत, ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्रीपाल सबनीस यांनी पुणे येथे दि.५ रोजी आयोजित राज्यस्तरीय चैत्रपालवी काव्य पुरस्कार वितरण प्रसंगी केले.

शिरूर कासार येथील बाल साहित्यिक डॉ.विठ्ठल जाधव यांच्या 'अटर का पटर' बालकविता संग्रहास चैत्रपालवी राज्यस्तरीय मराठी साहित्य पुरस्काराने श्रीपाल सबनीस यांचे हस्ते एस.एम.जोशी सभागृह, पत्रकार भवन, पुणे येथे गौरविण्यात आले. डॉ.विठ्ठल जाधव यांच्या उंदरीन सुंदरीन, बटाटीची धार, पांढरा कावळा या कलाकृतींसह बालसाहित्य या अवघड विषयाकडे 'अटर का पटर' या बालकविता संग्रहाच्या निमित्ताने वाचकांचे लक्ष वेधले आहे. जाधव यांची साहित्यकृती दखलपात्र ठरली आहे. दत्ता डांगे (नांदेड) आणि चित्रकार शीतल शहाणे यांनी परिश्रमपूर्वक ही कलाकृती पुस्तकातून साकारली आहे. पुरस्कार वितरण प्रसंगी जेष्ठ साहित्यिक बबन पोतदार, प्राचार्य हनुमंत धालगडे, कवी चंद्रकांत जोगदंड हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी राजेंद्र जेधे, व्यंकटराव वाघमोडे, ओंकार जेधे, रूपाली अवचारे यांचेसह महाराष्ट्रातील नामवंत कवी लेखक उपस्थित होते. सुत्रसंचलन आशा शिंदे यांनी केले. तर आभार आनंद गायकवाड यांनी मानले.

# बुथ ताब्यात घेत बोगस मतदान; फेर मतदानाची सोनवणेंची मागणी

## मुख्य निवडणुक निर्णय अधिकारी यांना पत्र

बीड । प्रतिनिधी

बीड लोकसभा मतदार संघाच्या निवडणूकीसाठी दि.१३ मे रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. यावेळी परळीसह इतर तालुक्यात मतदान केंद्र ताब्यात घेवून बोगस मतदान केल्याचे समोर येत असून याठिकाणी इनकॅमेरा फेर मतदान घ्यावे, अशी मागणी महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी मुख्य निवडणुक निर्णय अधिकारी यांना पत्र दिले आहे.

पत्रात म्हटले आहे, बीड लोकसभा या मतदार संघातून नॅशनॉलिस्ट काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार यांचा उमेदवार म्हणून उभा आहे. दि.१३ मे रोजी मतदान सुरु झाल्यानंतर एका तासामध्येच परळी मतदार संघातील इंजेगांव, सारडगांव, धर्मापुरी, डिग्रस, नाथ्रा, कीडगांव साबळा, जिरेवाडी, बालेवाडी व कन्हेरवाडी या गावातील मतदान केंद्रावर व मतदान केंद्र क्रमांक १८८, १८९, १३२ व १६१ आणि केज तालुक्यातील देवगाव, लाडेवडगाव, माजलगांवमधील गोविंदवाडी व धारुर मधिल सोनिमोहा, पिंपरवडा, मंदवाडी व चाडगांव आष्टीमधील वाली आणि पाटोदा मधील वाघीरा हे सर्व मतदान केंद्र ताब्यात घेवून बोगस मतदान केलेले आहे. याबाबत वारंवार जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी आणि पोलिस अधिक्षक बीड यांना मोबाईव्दारे बोगस मतदान थांबवण्याची विनंती केली परंतू दखल घेतली नाही. पूर्ण दिवस वरील केंद्रावर कोणतेही अधिकारी फिरकले नाहीत. त्यामुळे बोगस मतदान करणाऱ्यांना अधिकाऱ्यांची पण साथ आहे असे सिध्द होते. तसेच धर्मापुरी मतदान केंद्रावर मुस्लीम आणि जिरेवाडी मतदान केंद्रावर मागासवर्गीय मतदारांना मतदान करु दिले नाही. त्यांना मतदानापासून वंचित ठेवण्यात आले. ही बाब अत्यंत खेदजनक, गंभिर, असंवैधानिक व गुन्हेगारी स्वरुपाची असून लोकशाहीचा गळा घोटणारी आहे. त्यामुळे वरिल मतदान केंद्रावर फेर मतदान इनकॅमेरा तत्काळ घेण्याचे आदेशित करावे व लोकशाही वाचवावी तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कायदेशीर कार्यवाही करावी आणि मुस्लीम, मागासवर्गीय मतदारांना व मला न्याय द्यावा, असेही म्हटले आहे.

### मतदान इनकॅमेरा घेण्याची केली होती मागणी

निवडणूक होण्यापूर्वी जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांना दि.७ मे २०२४ व परत रिमायंडर म्हणून दि.९ मे २०२४ रोजी परळी व इतर मतदार संघातील काही मतदार केंद्रावरील मतदान इनकॅमेरा घ्यावे म्हणून विनंती केली होती, तसेच वॉट्सअॅपव्दारे दि.९ मे २०२४ निवडणूक निरिक्षक यांना पाठवले परंतू तेथील मतदान इनकॅमेरा घेण्याबाबत कोणताही निर्णय घेतला नाही.

## रोटरी क्लबच्या वतीने मतदारांना वृक्षांचे वाटप





अंबाजोगाई -:प्रतिनिधी

शहरात वृक्ष चळवळ जोपासली जावी. वृक्ष लागवडीच्या माध्यमातून निसर्गाचा समतोल राखण्यासाठी सोमवारी दिवसभर श्री.खोलेश्वर विद्यालया समोर रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या वतीने ४०० विविध प्रकारच्या रोपट्याचे वाटप मतदान करण्यासाठी येणाऱ्या कुटुंबांना वाटप करण्यात आले.

अंबाजोगाई शहरातील या वर्षी नवीन १० हजार वृक्ष लागवडीचा संकल्प रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी च्या वतीने करण्यात आला. मतदानाच्या पार्श्वभूमीवर सोमवारी दिवसभर खोलेश्वर विद्यालयाच्या प्रवेशद्वारा समोर हा उपक्रम राबविला. शहरातील ४०० कुटुंबांना वृक्षांचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी अनेक राजकीय व सामाजिक कार्यकर्ते यांनाही वृक्षरोप भेट म्हणून देण्यात आले. या उपक्रमासाठी रोटरीचे अध्यक्ष स्वप्नील परदेशी,सचिव गणेश राऊत, कल्याण काळे, धनराज सोळंकी,डॉ.बालासाहेब लोमटे, प्रा.संतोष मोहिते,प्रदीप झरकर,अॅड अनिल लोमटे, यांच्यासह रोटरी चे सदस्य व मान्यवर उपस्थित होते.

# भारतीय सैनिकांचा अवमान करणाऱ्या भाजपा मंत्र्यांच्या प्रतिमेला मारले जोडे




## भाजपा मंत्री विजय शहावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा–काँग्रेस

माजलगाव । प्रतिनिधी

ज्या अतिरेक्यांनी आपल्या निष्पाप नागरिकांना गोळीबार करत मारले. त्याचा बदला म्हणून भारतीय सैनिकांनी ऑपरेशन सिंधूर राबवत कर्नल सोफिया कुरैशी व पायलट व्योमिका सिंह यांनी पाकिस्तानातील दहशतवाद्यादी तळावर हवाई हल्ले करून दहशतवाद्यांचे समुळ नष्ट केले.

अशा जाबाज सैनिकांच्या पराक्रम,शौर्याचे संपूर्ण देश कौतुक करत असताना मध्ये प्रदेश सरकार मधील भाजपा मंत्री विजय शहा यांनी आम्ही अतिरेक्यांना मारायला त्यांचीच बहिण पाठवली म्हणत बेताल, बेजबाबदार, संतापजनक वक्तव्य करून आपल्या सैनिकांचा अवमान करीत त्याचं खच्चीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे.

अशा भाजपा मंत्र्यांच्या प्रतिमेला काँग्रेस सह समविचारी पक्षाच्या वतीने दि १४ मे बुधवार रोजी माजलगाव शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी जोडे मारून मंत्री विजय शहाला तात्काळ मंत्री मंडळातून हाकलून त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा असे काँग्रेस तालुकाध्यक्ष नारायण होके पाटील,काम्रेड बाबा मुस्दीक,शेख रशीद, राजेश घोडे,नामदेव सोजे,हरिभाऊ सोळंके,धम्मानंद साळवे,दत्ता कांबळे,फारूक शेख,मनोज फरके, शरद यादव यांच्या सह कार्यकर्त्यांनी केली.

# पाटोद्यात बेकायदेशीर वृक्षतोड; वन विभागाच्या हलगर्जीपणामुळे पर्यावरण धोक्यात

**पाटोदा । प्रतिनिधी**

**पाटोदा तालुक्यात सध्या मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर वृक्षतोड सुरू असून, त्यामुळे परिसरातील नैसर्गिक परिसंस्था धोक्यात आली आहे. हे सगळं घडत असताना वन विभाग मात्र निवांत असून, त्यांच्या हलगर्जीपणामुळे पर्यावरणाचे गंभीर नुकसान होत आहे.**

स्थानिक पर्यावरणप्रेमींनी ही माहिती वन विभागाला दिली तेव्हा अधिकारी मुख्यालय ठिकाणी उपस्थित नव्हते तर अधिकाऱ्यांनी पर्यावरणप्रेमींनी महिला कर्मचारी असल्याने कर्मचाऱ्यांच्या पतीचा दिला नंबर ही बाब अतिशय गंभीर असून ह्या प्रकरणाची वरिष्ठांनी चौकशी करून कारवाई केली पाहिजे तसेच पाटोदा वन विभाग कार्यालयातील कर्मचाऱ्यांमध्ये समन्वयाचा पूर्ण अभाव आहे. यामुळे वृक्षतोड करणाऱ्यांना मोकळे रान मिळाले आहे.वनविभागाचे कर्मचारी ही स्थिती रोखण्यात पूर्णपणे अपयशी ठरले आहेत. त्यांच्या निष्काळजीपणामुळे आणि दुर्लक्षामुळे शेकडो झाडांची कत्तल होत आहे. हे



केवळ कायद्याचे उल्लंघन नाही तर भविष्यातील पिढ्यांवर अन्याय करणारा अपराध आहे.पर्यावरणवाद्यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेत तात्काळ चौकशीची मागणी केली आहे. दोषी कर्मचाऱ्यांवर निलंबनासह कडक शिस्तभंगात्मक कारवाई करावी, अशी ठाम मागणी केली जात आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने पाहून पर्यावरण रक्षणासाठी ठोस पावले उचलावीत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# गणेश विद्या मंदीर शाळेचे घवघवीत यश

अंमळनेर । प्रतिनिधी

अंमळनेर(भां) येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री गणेश विद्यामंदिर विद्यालयाने फेब्रुवारी–मार्च २०२५ मध्ये झालेल्या एसएससी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून विद्यालयाचा शेकडा निकाल ९८.२४% लागला आहे.परीक्षेला बसलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी ८८ विद्यार्थी विशेष प्राविण्य श्रेणीत,१८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर ६ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.कु.क्रांती केशव आहेर या विद्यार्थिनीने ९७% गुण मिळवून विद्यालयातून सर्वप्रथम,कु. शितल त्रिंबक पोकळे ९६.४०% गुण मिळवून द्वितीय तर कौशल पांडुरंग पवार या विद्यार्थ्याने ९४.२०% गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला आहे.तर अनिल आजिनाथ जायभाये या विद्यार्थ्यांने ९०.४०% गुण मिळवत गहिनिनाथ वसतिगृहातून प्रथम येण्याचा मान मिळवला आहे.शाळेच्या जवळपास २३ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण मिळविले आहेत.सदर परीक्षेला प्रविष्ट झालेल्या एकूण



विद्यार्थ्यांपैकी ८८ विद्यार्थी विशेष प्राविण्य श्रेणीत,१८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर ६ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

विद्यालयाच्या या नेत्रदीपक यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे जनरल बाडी सदस्य तथा स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन ए.टी.पोकळे, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य भास्कर पोकळे, मुरलीधर पवार,शाळेचे मुख्याध्यापक आर बी बडे पर्यवेक्षक एफ एस जाधवर ,सर्व स्कूल कमिटी सदस्य ,शाळा व्यवस्थापन समिती सदस्य ,शाळा व्यवस्थापन व विकास समिती सदस्य,श्री गहिनिनाथ वसतिगृह अधिक्षक व कर्मचारी तसेच सर्व शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारीवृंद यांनी अभिनंदन केले.

# विद्यार्थ्यांचे परिश्रम व शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळे शंभर टक्के निकालाचे सातत्य – राजकिशोर मोदी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ अंबाजोगाई संचलित मानव विकास निवासी मूकबधिर विद्यालयाचा शालांत परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला असून यावर्षीही विद्यालयातील विद्यार्थ्यांनी १०० टक्के निकालाची यशस्वी परंपरा कायम राखली आहे. मानव विकास निवासी मूकबधिर विद्यालयाचा माध्यमिक शालांत परीक्षेच्या निकालात यावर्षी शाळेचा निकाल एकूण १००% लागला असून या निकालामध्ये ०६ विद्यार्थी विशेष प्राविण्य तर प्रथम श्रेणीत ४ विद्यार्थी

## मानव विकास मूकबधिर विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल १०० टक्के


उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयातून सर्वप्रथम येण्याचा बहुमान दत्तप्रसाद अर्जुन मुंडे याने ७९.४० टक्के गुण प्राप्त करून पटकावला आहे व विजय उमाकांत फड ७९% व स्वप्निल अशोक सूर्यवंशी ७८.६० % गुण घेऊन द्वितीय व तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत. शाळेमध्ये घेण्यात येणाऱ्या सर्व विषयाच्या जादा तासिका, साप्ताहिक, मासिक व सराव परीक्षांचा परिणाम म्हणून या निकालाचे सातत्य राखण्यात विद्यार्थ्यांना यश आले असल्याचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी यांनी सांगितले.

गेल्या २३ वर्षापासून मानव विकास मूकबधिर विद्यालय आपल्या निकालाची यशस्वी परंपरा विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देऊन जोपासत आहे. मूकबधिर विद्यार्थ्यांना विभाग प्रमुख दिलीप साठे , डी. बी. शिंदे, एन. व्ही. बारस्कर, श्रीमती भालकीकर, भालचंद्र नांदुरकर आदींनी मार्गदर्शन केले. या निकालाबद्दल

# दहावी परीक्षेत श्रावणी वाघुळकरला ९५. टक्के गुण

अंबड । प्रतिनिधी

इयत्ता दहावीच्या परीक्षेत अंबड येथील जैन इंग्शिल स्कुलची विद्यार्थीनी कु. श्रावणी श्रीपाद वाघुळकर हिने ९५.२० % गुण मिळवून घवघवीत यश संपादन केल्याबद्दल अभिनंदन होत आहे. अंबड एस टी महामंडळ डेपोचे वाहक श्रीपाद वाघुळकर यांची कन्या श्रीवणी आहे



श्रावणी हिने दहावीच्या परिक्षेत ९५.२० टक्के गुण मिळवून सुयश संपादन केले आहे. या यशाबद्दल अंबड बस स्थानक आगार विभागातील वाहक व चालकच्या वतीने तसेच विद्यालयाच्या शिक्षकांनी श्रावणीचे अभिनंदन केले आहे.

# दुचाकीस्वाराला वाचवण्याच्या प्रयत्नात एर्टिगा कार पलटी; दोन ठार, चार गंभीर जखमी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई–आडस रस्त्यावरील उमराई पाटीजवळ आज दुपारी एक भीषण अपघात घडला. दुचाकीस्वाराला वाचवण्याच्या प्रयत्नात एर्टिगा कार उलटून झालेल्या या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला, तर चार जण गंभीर जखमी झाले आहेत.



सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, माजलगाव तालुक्यातील पातरुड येथील एक कुटुंब विवाह समारंभासाठी एर्टिगा कारमधून (एमएच ०५ सीव्ही ९१८६) अंबाजोगाई येथे येत होते. यावेळी उमराई पाटी परिसरातील दत्त मंदिरासमोर एक दुचाकीस्वार अचानक कारसमोर आला. दुचाकीस्वाराला धडक टाळण्याच्या प्रयत्नात चालकाचा कारवरील ताबा सुटला आणि कार रस्त्याच्या कडेला जाऊन उलटली. या भीषण अपघातात शौकत अहमद शेख (वय ४६) आणि खय्युम अब्बास अत्तर (वय ४५) या दोघांचा जागीच मृत्यू झाला. इतर चार जण गंभीर जखमी असून त्यांना उपचारासाठी तातडीने स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# साने गुरुजी माध्यमिक विद्यालयाचे दैदिप्यमान यश



वडवणी । प्रतिनिधी

परभणी केसापुरी येथील साने गुरुजी माध्यमिक विद्यालयाने नुकत्याच जाहीर झालेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेत आपल्या दैदिप्यमान निकालाची यशस्वी परंपरा कायम राखत पुन्हा एकदा ग्रामीण भागातून सर्वोत्कृष्ट होण्याचा बहुमान मिळविला आहे . विद्यालयाचा एकूण निकाल शे ९६.२२%इतका लागला असून एकूण ११ विद्यार्थी ९०%पेक्षा जास्त गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत पान ३ वर

# युसूफवडगांव माध्यमिक विद्यालयाची उज्ज्वल निकालाची परंपरा कायम

**युसूफवडगांव । प्रतिनिधी**

**बारावी बोर्डाचा निकालापाठोपाठ दहावी बोर्ड परीक्षाच्या निकालात केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील भालचंद्र शिक्षण संस्था लिंबागणेश संचलित युसूफवडगांव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वडगाव या शाळेने प्रतिवर्षाप्रमाणे आपल्या गुणवत्तेवर शिक्कामोर्तब केले आहे.**

विद्यालयातून एस.एस.सी. बोर्ड परीक्षा मार्च २०२५ या परीक्षेसाठी एकूण १३४ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १३१ उत्तीर्ण झाले.शाळेचा एकूण निकाल ९७.७६% लागला आहे.ज्यामध्ये सर्वप्रथम कु.शिंदे समृद्धी शरद ९६.६०% द्वितीय क्रमांक कु.गुंड साक्षी सोमनाथ ९६.४०% तर तृतीय क्रमांकावर कु.खरबड शितल रामेश्वर ९५.८०% हे विद्यार्थी आहेत.या सोबतच याच विद्यालयातील भाग शाळा पैठण या मधून सर्व प्रथम चि.सरवदे विकास बाबासाहेब ९३%. द्वितीय चि.पवार तेजस बाळासाहेब ९१% तर तृतीय क्रमांक चि.मस्के गणेश पांडुरंग ८८.८०% यांनी पटकावले. या निकालात युसुफ वडगाव मध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय या शाळेतून एकूण ९०% पेक्षा जास्त गुण घेणारे १६ विद्यार्थी असून विशेष प्रावीण्यासह ७४ विद्यार्थी तर प्रथम श्रेणीत ४५ विद्यार्थी व विद्यार्थी द्वितीय श्रेणीत ०९ विद्यार्थी व उर्वरित पास श्रेणीत पान ३ वर

# वाढदिवसाच्या निमित्ताने ५ लाख ३७ रूपये जमा झाले, पंतप्रधान सहाय्यता निधीला अक्षय मुंदडा रक्कम जमा करणार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राजकीय क्षेत्रात काम करणारा तरूण संवेदनशील भुमिकेत वागत असेल तर खर्या अर्थाने समाज आदर्शाचे अनुकरण निश्चित करतात. भाजपाचे युवा नेते अक्षय मुंदडांनी स्वत:चा वाढदिवस साधेपणाने साजरा करताना विविध सामाजिक उपक्रम हाती घेतले. शिवाय शुभेच्छा देणार्या हितचिंतकांनी पंतप्रधान सहाय्यता निधीला



योगदान देण्याचे आवाहन केल्यानंतर दिवसभरात सुमारे ५ लाख ३७ हजार रूपयाचा निधी जमा झाला तर ७५ तरूणांनी रक्तदान केले.

भारत–पाकिस्तान युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभुमीवर मुंदडांनी वाढदिवस रद्द करून सामाजिक उपक्रम हाती घेण्याचे आवाहन केले होते. शुभेच्छा देण्यासाठी येणार्या कार्यकर्ते, मित्र परिवारांनी पान ३ वर

# श्री संत गोरोबा काका मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे श्री संत गोरोबा काका व श्री. विठ्ठल रुक्मिणी मुर्ती प्राण प्रतिष्ठा सोहळा महंत ह.भ.प सुदर्शन महाराज व भागवताचार्य ह.भ.प काशिनाथ महाराज शास्त्री यांच्या हस्ते संपन्न झाला. मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त ह.भ.प काशीनाथ एक महाराज शास्त्री यांचे कीर्तन संपन्न झाले.यावेळी युवा नेते जयदत्त (भैय्या) धस , मा.जि.प अध्यक्ष विजय गोल्हर, डॉ.अशोक सोनवणे, गोरक्षनाथ



गोरे, विनायक राऊत,मा. सभापती शत्रुघ्न मरकड, सरपंच दत्तात्रय खोटे,धामणगाव गटाचे नेते संजय गाढवे, मा. पंचायत समिती सदस्य रावसाहेब लोखंडे, बाबासाहेब झिंजुर्के,मोहन जगताप , संतोष भणगे ,सरपंच अशोक गर्जे, श्रीमंत भोसले,संजय भोसले, ज्ञानेश्वर भोसले,शेषराव भोसले, सुरेश खिलारे,लक्ष्मण भोसले, भागवत बोराडे, दादासाहेब खिलारे, बाबासाहेब झरकर, बाबासाहेब भोसले, जगन्नाथ खिलारे, नवनाथ भगत, बबन जगताप, कल्याण राऊत,राम कुलकर्णी, यादव महाराज,शिवाजी खिलारे, सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार समीर शेख शिवाजी बोराडे व संत श्री गोरोबा काका सेवा मंडळाचे सर्व सदस्य , माता भगिनी,सांगवी पाटण येथील ग्रामस्थ व पंचक्रोशीतील सामाजिक राजकीय ,शैक्षणिक ,धार्मिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रामनगर आश्रम शाळेची उत्तुंग भरारी



माजलगांव । प्रतिनिधी

तालुकयातील रामनगर येथील माध्यमिक आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांनी फेब्रुवारी मध्ये घेण्यात आलेल्या एस.एस.सी परीक्षेत उत्तुग भरारी घेतली आहे.विद्यालयातुन परिक्षेसाठी ६२ विद्यार्थी बसले होते, यामध्ये ५६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.शाळेचा निकाल ९०. ३२ टक्के लागला आहे.

विशेष प्राविण्य श्रेणीमध्ये १५ विद्यार्थी उतीर्ण झाले आहेत.प्रथम : कु . वैष्णवी गजानन हराळ ८४%द्वितीय : चि. भागवत दादाराव कटके ८३.६० % तृतीय : चि . रमेश गणेश बाबर ८१.४०% तसेच १२ विद्यार्थी ७० ते ८० टक्के घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अविनाश पवार, डॉ . आशिष पवार, मुख्याध्यापक मठपती सी..व्ही व सर्व शिक्षक व शिक्षकेतर /कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.

# पठाण माजेदखान फिरोजखान यांचे दहावी परीक्षेत यश

पाटोदा । प्रतिनिधी

दहावीच्या परीक्षेत पठाण माजेदखान फिरोजखान ८८.६०% गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. कष्ट, आत्मविश्वास आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या जोरावर मिळवलेले हे यश प्रेरणादायी आहे. त्यांच्या यशामुळे कुटुंबीयांसह मित्रपरिवारात आनंदाचे वातावरण आहे.



पठाण माजेदखान फिरोजखान यांनी अभ्यासात दाखवलेली चिकाटी आणि मेहनत कौतुकास्पद आहे. शाळेच्या शिक्षक आणि पालकांच्या मार्गदर्शनासह त्यांनी हे यश मिळवले आहे. त्यांच्या यशाने शाळेचे नाव उज्वल केले असून, इतर विद्यार्थ्यांसाठी ते प्रेरणेचे स्रोत ठरले आहेत. युवा नेतृत्व जुनेद भैय्या पठाण परिवारातर्फे पठाण माजेदखान फिरोजखान यांचे हार्दिक अभिनंदन व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा !

# पाटोद्याच्या पवनचक्कीतून पाऊन कोटीचे साहित्य चोरीस

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील भायाळा व गवळवाडी परिसरातील पवनचक्कीच्या टॉवर व नेसलमधील विविध प्रकारचे कॉपर वायर व इतर इलेक्ट्रीक साहित्य अज्ञात चोरट्यांनी चाररून नेले. त्या साहित्याची किंमत सुमारे ७२ लाख ४१ हजार ६९४ रुपये असून अन्य एका पवन चक्कीमधूनही सुमारे ४ लाख ७० हजार ४२१ रुपयांचे साहित्य चोरून नेल्याची घटना घडली. या प्रकरणी रामराय ताबें यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पाटोदा तालुक्यातील भायाळा व गवळवाडी शिवारामध्ये पवनचक्की उभारण्याचे काम सुरू आहे. भायाळा येथील पवनचक्कीचे टॉवर व नेसलमध्येविविध प्रकारचे कॉपर, केबल, व इतर इलेक्ट्रीक साहित्य होते. अज्ञात चोरट्यांनी पवनचक्की क्र.क्र.१६ मधील कॉपर धातूचे लिफ्ट केबल, रोटर केबल, स्टार्टर केबल, आर्थिक केबल, कंट्रोल केबल, सेफ्टीचेन केबल, ब्रिड केबल, फिडबॅक केबल यासह विविध प्रकारचे इलेक्ट्रीक कॉपर धातूचे साहित्य असा एकूण ७२ लाक ४१ हजार ६९४ रुपयाचे साहित्य चोरून नेले. पुढे चोरटे याच भागातील गवळवाडी शिवारातील पवनचक्कीला लक्ष्य करत त्या पवनचक्कीमधीलही कॉपर धातू केबल व इलेक्ट्रीक साहित्य असा ४ लाख ७० हजार ४४१ रुपयांचे साहित्य चोरून नेले. दोन पवन चक्क्यांमधून सुमारे ७७ लाख १२ हजार १३५ रुपयांचे साहित्य अज्ञात चोरट्यांनी चोरले असून या प्रकरणी उंबरविहीरा येथील रामराया बाबूराव तांबे यांच्या फिर्यादीवरून पाटोदा पोलिस ठार्यात गु.र.नं. १५८/२०२५ कलम ३०३ (२), भा.न्या.न. २०२३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक जाधव हे करत आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# रक्तदान ही एक व्यापक चळवळ व्हायला हवी-राजेश शहा

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र गुजराती समाज महामंडळ, धी पूना गुजराती केळवणी मंडळ आणि श्री पूना गुजराती बंधू समाज यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यातील प्रतिष्ठित हरिभाई व्ही. देसाई महाविद्यालयात रक्तदान आणि डोळे तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.




अध्यक्ष राजेश शहा व पूना हॉस्पिटल मॅनेजमेंटचे ट्रस्टी सुजय शहा यांच्या शुभहस्ते या शिबिराचे उद्धाटन करण्यात आले. समाजातर्फे वर्षभर सुरू असलेल्या रक्तदान शिबिरांद्वारे जवळपास १००० रक्तदात्यांचे रक्त संकलन केले गेले. यामध्ये पूना हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरच्या राकेश जैन रक्तपेढीने आपली भूमिका बजावली. तर देसाई हॉस्पिटलच्या माध्यमातून नागरिकांचे डोळे तपासून त्यांना चष्म्यांचेही मोफत वाटप करण्यात आले.

या रक्तदान शिबिराचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी बोलताना संस्थेचे चेअरमन राजेश शहा यांनी 'सद्याची युद्धमय परिस्थिती पाहता आतापासूनच देशभरातून मोठ्या प्रमाणात रक्त संकलनाची व्यापक मोहीम हाती घेणे गरजेचे ठरते, असे मत व्यक्त केले. तसेच, एच व्ही देसाई डोळ्यांचे हॉस्पिटलद्वारे आजपर्यंत हजारो नागरिकांच्या डोळ्यांवर मोतीबिंदू, काचबिंदू या शस्त्रक्रिया मोफत करण्यात आल्या असून हे कार्य अविरतपणे चालूच राहील, अशी ग्वाही राजेश शहा यांनी दिली.

या रक्तदान शिबिराची सुरुवात डॉ. ऋषी दुबे आणि संदीप देशपांडे यांच्या रक्तदानाने झाली. या शिबिरात एकूण ६७ रक्तदात्यांनी रक्तदान केले. तर सुमारे २५४ एवढ्या नागरिकांनी डोळे तपासून जवळपास १०० जणांनी चष्माही मिळविला. तसेच अनेक गरजूंनी आपल्या डोळ्यावरील अत्यावश्यक व खर्चिक असणाऱ्या शस्त्रक्रिया मोफत करून घेतल्या. हा कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी अनेकांचा हातभार लाभला. नैनेश नंदू, राजेंद्र शहा, हरैश शहा हेमंत मणियार, विनोद देडिया, संदीप शहा, हेमंत मेहता, संजय मेहता, केतन कापडिया, दिपक महैता पंकज देडिया आणि श्रीमती कृती नागरेचा यांनी या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी अविरत श्रम घेतले.

या कार्यक्रमात महाविद्यालयाच्या वतीने महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक डॉ. ऋषी दुबे, महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजनेचे विकास मुळीक, विद्यार्थी तसेच संस्थेचे प्रशासकीय अधिकारी संदीप देशपांडे यांनी विशेष मेहनत घेतली. महाविद्यालयाच्या स्पर्धा परीक्षा विभागातील विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी स्वतःही रक्तदान करून इतरांना रक्तदान करण्यासाठी प्रोत्साहन दिले.

# निवडणुकांपूर्वी पुणे, पिंपरी-चिंचवड भाजपमध्ये नव्या नियुक्त्या; धीरज घाटे आणि शत्रुघ्न काटेंना जबाबदारी

**पुणे । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाने राज्यातील प्रमुख शहरांतील शहराध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. पुणे शहराध्यक्षपदी पुन्हा एकदा धीरज घाटे यांची निवड करण्यात आली आहे. श्रीनाथ भिमाले, माजी सभागृह नेते गणेश बिडकर यांच्यासह अन्य इच्छुकांनीही या पदासाठी प्रयत्न केले होते. मात्र, पक्षश्रेष्ठींनी पुन्हा घाटे यांच्यावर विश्वास दाखवला आहे. माध्यमांशी संवाद साधताना घाटे म्हणाले, गेल्या दोन वर्षांत लोकसभा, विधानसभा आणि सदस्य नोंदणी मोहिमेत उल्लेखनीय कामगिरी करण्यात आली. हे यश संघटनाच्या ताकदीमुळेच शक्य झाले.



आगामी महापालिका निवडणुकीत भाजपचा महापौर होईल. मागील निवडणुकीत १०० हून अधिक नगरसेवक निवडून आले होते. यावेळी ही संख्या वाढेल, असा विश्वास धीरज घाटे यांनी व्यक्त केला आहे. महायुतीच्या पार्श्वभूमीवर भाजप स्वतंत्रपणे निवडणूक लढवणार की आघाडी करणार, याबाबत विचारले असता, त्यांनी स्पष्ट केले की, या संदर्भात अंतिम निर्णय वरिष्ठ नेतेच घेतील.

पिंपरी-चिंचवड शहराध्यक्षपदी माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपचे राज्य निवडणूक अधिकारी चैनसुक संचेती यांनी ही अधिकृत घोषणा केली. राज्यभरात भाजपच्या संघटनात्मक जिल्ह्यांसाठी एकूण ५८ जिल्हाध्यक्षांची निवड करण्यात आली आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील महापौर आणि स्थायी समिती अध्यक्ष अशा महत्त्वाच्या पदांसाठी शत्रुघ्न काटे यांचा नेहमीच विचार होत आला आहे. मात्र, काही काळ त्यांना संधी नाकारली गेली होती. अखेर पक्षाने त्यांच्यावर विश्वास दाखवत शहराध्यक्षपदाची जबाबदारी दिली आहे. माध्यमांशी बोलताना काटे म्हणाले की, आगामी महापालिका निवडणुकीसाठी भाजप पूर्णपणे सज्ज आहे. पक्षनेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली आम्ही निवडणुकीला सामोरे जाणार आहोत.

# गज्या मारणेसह पोलिसांचा डर्टी पिक्चर, सांगलीच्या वाटेत मटण पार्टी; निलंबनाच्या कारवाईसह गुन्हेही दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

कुख्यात गुंड गजा मारणे आणि पोलिसांच्या मटन पार्टीची चर्चा चांगलीच रंगली आहे. पुण्यात मुख्य कारवाई झाल्यानंतर सुरक्षेच्या दृष्टीने गजा मारणे यांना सांगली कारागृहात नेताना पुणे पोलिसांनी कणसे धाब्यावर मटन पार्टी केली होती. गपचूप केलेल्या मटन पार्टीची माहिती पुणे पोलीस आयुक्तांना मिळाली. पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी थेट चार पोलीस कर्मचारी आणि अधिकाऱ्यांचं निलंबन केले.

गजा मारणे.... पुण्यातला कुख्यात गुंड... कधी जेलमधून सुटल्यानंतरची रॅली चर्चेत असते.... तर कधी पुणे पोलिसांसमोर गुडघ्यावर बसलेला फोटो चर्चेत येतो.... एवढेच नाही तर काढलेली धिंडदेखील चर्चेत असते... पुण्यातला कायम चर्चेत असलेला गजा मारणे आज पुन्हा एकदा चर्चेत आला ... असा तसा नाही तर थेट पुणे पोलिसांसोबत केलेल्या पार्टीमुळे... मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या निकटवर्तीयाला मारहाण केल्यानंतर गजा मारणे याच्यावर पुणे पोलिसांनी मोकाच्या अंतर्गत कारवाई केली खरी आणि त्यानंतर त्याला पुन्हा येरवड्यातली जेलवारी झाली. मात्र, संरक्षणाखातर गजा मारणेची रवानगी सांगलीतील कारागृहात करण्यात आली. बारा मार्चला त्याला सांगली कारागृहात नेण्याचा निर्णय झाला आणि पुणे पोलिसांचं पथक त्याला सांगलीत घेऊन जाण्यासाठी निघालं. मात्र सांगलीला जात असतानाच



सातारा जवळील कणसे धाब्यावर पोलिसांची व्हॅन थांबली. व्हॅन थांबल्यावर पोलीस आणि गजा मारणे यांनी मटणाची पार्टी केली. हा सर्व प्रकार सीसीटीव्हीत कैद झाला आणि त्यानंतर याचा सगळा कानोसा पोलीस आयुक्तांना लागला आणि त्यांनी थेट चौकशी केली असता हा सगळा प्रकार समोर आला. पोलिसांनी थेट या पोलिसांवर निलंबनाची कारवाई केली आहे. ही पार्टी इथेच थांबली नाही तर या पार्टी दरम्यान गजा मारणेला दोन फॉर्च्युनर अन् एका थार भेटायला आली आणि यातून गजा मारणेचे सहकारी खाली उतरले... त्यांनी देखील पार्टी केली... यात सतीश शिळीमकर, विशाल धुमाळ आणि बाळकृष्ण उर्फ पांड्या मोहिते हे तिघं होते. मोक्का कारवाईनंतर गजा मारणेला भेटायला आलेले आणि पोलिसांनी बिनधास्त सगळ्यांना भेटू दिलं. यातील विशाल धुमाळवर खूनाचा गुन्हा दाखल आहे, तर पांड्या मोहिते सांगलीत गजा मारणेच्या टोळीचा शूटर आहे. आता या तिघांवरही गुन्हा दाखल करण्यात आला.

निलंबित करण्यात आलेल्या पोलिसांची नावं

सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरज राजगुरू, पोलीस हवालदार महेश बामगुडे, सचिन मेमाने, पोलीस शिपाई राहुल परदेशी

# पिंपरी चिंचवडमधील 'ते' २९ बंगले ३१ मे पूर्वी जमीनदोस्त होणार! सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील चिखली परिसरात इंद्रायणी नदीच्या निळ्या पूररेषेत बांधलेल्या २९ बेकादेशीर बंगले आणि इतर बांधकामे पाडण्यावर रहिवाश्यांनी सर्वोच्च न्यायालयात केलेला अपील अर्ज फेटाळला आहे. त्यामुळे हरित लवादाने दिलेला निर्णय कायम ठेवत, ३१ मे पूर्वी ही नदीपात्रातील बांधकामे पाडून नदीचे मूळ क्षेत्र पुन्हा मूळ स्थितीत आणण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. दरम्यान न्यायालयाच्या आदेशानुसार इंद्रायणी नदीच्या पूररेषेतील बांधकामांवर कारवाई करण्यात येणार असून दोन दिवसांची मुदत येथील रहिवाश्यांना देण्यात येणार असल्याचे पालिका प्रशासनाने म्हटले आहे.



चिखली येथील इंद्रायणी नदीच्या निळ्या पूररेषेत बांधलेले २९ बेकायदा बंगले आणि इतर बांधकामे पाडण्यावर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केलं. न्यायमूर्ती अभय एस. ओका आणि उजल भूयन यांनी येथील रहिवाशांचा अपील अर्ज फेटाळून लावला आहे. त्यामुळे हरित लवादाने दिलेला निर्णय कायम राहिला असून, जिल्हाधिकारी आणि महापालिकेला ही अनधिकृत बांधकामे दि. ३१ मे पर्यंत जमीनदोस्त करावी लागणार आहेत. चिखलीतील सर्व्हे नंबर ९० मध्ये बंगलो प्लॉट बांधकाम प्रकल्प करण्यात आला होता. हे प्लॉटिंग मे. जरे वर्ल्ड आणि इतरांचं आहे. महापालिका हद्दीत इंद्रायणी नदीपात्रातील निळ्या पूररेषेच्या प्रतिबंधित क्षेत्रात ही बांधकामे करण्यात येत होती. या बांधकामामुळे नदीचे अस्तित्व धोक्यात आणून पर्यावरण संरक्षण आणि सुधारणा कायद्यांचे उल्लंघन केले जात होते. संबंधित विकासकांनी पर्यावरण अधिनियमातील तरतुदींचं उल्लंघन केलं.

इंद्रायणी पूररेषेतील हे बंगले पाडण्याचे हरित लवादाने आदेश दिले होते. मात्र, संबंधित रहिवाशांनी न्यायालयात धाव घेतल्याने बांधकामे पाडण्याची कारवाई थांबली होती. आता सर्वोच्च न्यायालयाने याचिका फेटाळल्याने ही बांधकामे पडण्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. मात्र, पावसाळ्यात ही बांधकामे पाडता येणार नाहीत. महापालिकेला ही बांधकामे आता ३१ मेपूर्वीच पाडावी लागणार आहेत. हरित लवादाने हे बांधकामे पाडण्याचे आदेश दिलेले होते. त्या विरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेणाऱ्या रहिवाशांची याचिका फेटाळून लावत सर्वोच्च न्यायालयाने हे क्षेत्र पुन्हा मूळ स्थितीत आणण्याचा आदेश दिला आहे. संबंधितांना पर्यावरण नुकसानभरपाईसाठी पाच कोटींचा दंडही ठोठावला आहे. त्यानंतर या रहिवाशांनी मुदत मागत फेर अर्ज केला होता. मात्र, न्यायालयाने तो ही फेटाळला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार इंद्रायणी नदीच्या पूररेषेतील बांधकामांवर कारवाई करण्यात येणार असून दोन दिवसांची मुदत येथील रहिवाश्यांना देण्यात येणार असल्याचे पालिका प्रशासनाने म्हटले आहे.

# भाजप पुणे उत्तर जिल्हाध्यक्षपदी प्रदीप कंद

**लोणी काळभोर । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष, पुणे जिल्हा बँकेचे संचालक, भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष प्रदीप कंद यांची भारतीय जनता पक्षाच्या उत्तर पुणे जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. नुकत्याच पक्षाच्या जिल्हाध्यक्षांची यादी जाहीर करण्यात आली. यामध्ये पुणे जिल्हा उत्तरच्या अध्यक्षपदी कंद यांची निवड करण्यात आली आहे.



प्रदीप कंद हे हवेली तालुक्यातील लोणीकंद येथील रहिवासी असून, त्यांनी आपली राजकीय कारकीर्द राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून सुरू केली. पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक म्हणून कार्यरत आहेत.

भारतीय जनता पक्षात प्रवेश करून नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीच्या वेळी त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या तिकिटावर निवडणूक लढविण्याची तयारी केली होती. गेल्या अनेक वर्षांपासून भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष म्हणून ते जिल्ह्यात कार्यरत आहेत. जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असताना कंद यांनी केलेल्या विकासकामांच्या जोरावर आमदारकी लढविण्याची तयारी केली होती.

परंतु, युतीच्या जागावाटपामध्ये शिरूर-हवेली मतदारसंघ अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी पक्षाला गेल्याने त्यांना निवडणुकीतून माघार घ्यावी लागली. युती धर्म पाळून लगेच निवडणुकीच्या कामास सुरुवात केली आणि महायुतीचे उमेदवार ज्ञानेश्वर कटके यांचा कसून प्रचार केला.

परणामी, शिरूर-हवेली मतदारसंघात महायुतीचे उमेदवार ज्ञानेश्वर कटके हे प्रचंड मताधिक्याने निवडून आले. या निवडणुकीत ज्ञानेश्वर कटके यांच्या खांद्याला खांदा लावून ते निवडणूक प्रचारात फिरले. त्यांच्या या कार्याची पक्षाकडून दखल घेऊन त्यांना जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

# सिंहगड रोड परिसरात मोफत आरोग्य शिबिर; ८० जणांनी घेतला लाभ

**पुणे । प्रतिनिधी**

विश्व हिंदू परिषद सिंहगड भाग, अखिल सिंहगड रोड धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव समिती आणि श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती ट्रस्ट, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. ११ मे २०२५) सिंहगड रोड परिसरात मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत झालेल्या या शिबिराचा ८० नागरिकांनी लाभ घेतला.




शिबिराला विश्व हिंदू परिषद सिंहगड भागाचे अध्यक्ष शरदजी जगताप, विभागमंत्री केतनजी घोडके, बजरंग दल संयोजक राजू कुडले, अमोलजी सावंत, मातृशक्ती संयोजिका शोभाताई श्रीगोंदेकर, नांदेड प्रखंड मातृशक्ती संयोजिका आशाताई खिलारे यांच्यासह विश्व हिंदू परिषदेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

या शिबिरात नागरिकांना मोफत आरोग्य तपासणी आणि मार्गदर्शनाचा लाभ मिळाला. आयोजकांनी सामाजिक बांधिलकीतून घेतलेल्या या उपक्रमाचे स्थानिक नागरिकांनी स्वागत केले. अशा शिबिरांमुळे समाजातील गरजूंपर्यंत आरोग्यसेवा पोहोचण्यास मदत होते, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# धक्कादायक! दहावीत कमी गुण मिळाल्याने विद्यार्थिनीने संपवलं

**पिंपरी । प्रतिनिधी**

दहावीच्या परीक्षेत ३९ टक्के इतके कमी गुण मिळाल्यामुळे आलेल्या नैराश्यातून सोळा वर्षीय विद्यार्थिनीने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही धक्कादायक घटना मंगळवारी (दि. १३) दुपारी दीडच्या सुमारास चर्होली फाटा येथील तनिष्क सोसायटीत उघडकीस आली.मुलीचे वडील बँकेत नोकरीला असून ती आई, वडील, मोठी बहीण आणि छोटा भाऊ यांच्यासमवेत राहत होती.




मंगळवारी (दि. १३) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा (एसएससी) आणि केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचा (सीबीएसई) दहावी परीक्षेचा निकाल जाहीर झाला. मुलीनेही दहावीची परीक्षा दिली होती. दुपारी एकच्या सुमारास तिने मोबाईलवर निकाल पाहिला. त्यानंतर काही वेळात ती घरातील शयनगृहात गेली.

बराच वेळ झाल्यानंतरही ती बाहेर न आल्याने तिच्या आईने खोलीत पाहिले असता मुलगी साडीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आली. हे पाहून आईने एकच हंबरडा फोडला. आवाज ऐकून शेजारी धावत आले आणि त्यांनी तातडीने दिघी पोलिसांना याची माहिती दिली. मुलीला यशवंतराव चव्हाण रुग्णालयात नेण्यात आले; मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले. दिघी पोलिस तपास करीत आहेत.

# व्हिलचेअर वापरणाऱ्याला 'उबर'च्या ड्रायव्हरनं नाकारली राईड! अपंग महिलेनं शेअर केलं भेदभावाचं वास्तव

**पुणे । प्रतिनिधी**

अपंगांना सरकार दरबारी दिव्यांग म्हणून संबोधलं जातं, सामान्य नागरिकांनीही त्यांना दिव्यांग असंच म्हणावं असा आग्रही धरला जातो. पण अपंग असणं म्हणजे खरंच दिव्य अंग असणं असं आहे का? यामुळं या लोकांच्या दैनंदिन अडचणी दूर होतात का? किंवा सार्वजनिक सेवांमध्ये त्यांना प्राधान्य किंवा महत्व दिलं जातं का? तर या सर्व प्रश्नांची उत्तर नाही अशी आहेत.

कारण पुण्यात नुकत्याच घडलेल्या एका घटनेमध्ये एका उबर कंपनीच्या कॅब चालकानं एका व्हिलचेअरवरील अपंग महिलेला इच्छित स्थळी सोडण्यास नकार दिला. या उदाहरणाद्वारे आपल्यासारख्या लोकांसोबत कायमच कसा भेदभाव केला जातो, याचं वास्तव शेअर केलंय अपंगांसाठी आणि दुर्लक्षित घटकांसाठी विविध एनजीओजच्या माध्यमातून काम करणाऱ्या दिक्षा दिंडे यांनी. आपल्या फेसबूक पेजवरुन पुण्यात राहणाऱ्या दिंडे यांनी आपल्यासोबत घडलेल्या



घटनेचा उल्लेख केला आहे. त्यांनी म्हटलं की, आज तिसऱ्यांदा णलशी ड्रायव्हरनं माझी राईड केवळ मी व्हीलचेअर वापरते म्हणून रद्द केली. तिसरी राईड मजेशीर होती. ड्रायव्हर पोहोचला, अमोलनं मला गाडीत बसवलं, पण ड्रायव्हर म्हणाला या व्हीलचेअरमुळं कारची सीट फाटेल. त्यामुळं त्यानं आम्हाला दोघांनाही कारमध्ये घेण्यास नकार दिला आणि राईड कॅन्सल करा असं सांगितलं. त्याच्या भेदभावपूर्ण वागण्यानं माझा वेळही वाया गेला आणि राईड रद्द करण्याचा चार्ज लागला तो वेगळाच.

सार्वजनिक वाहतूक अपंगांसाठी अजूनही सहज उपलब्ध नाही. या सार्वजनिक वाहनांमध्ये अपंगांसाठी जागा राखीव असली या वाहनांमध्ये आत जायचं कसं? असा मोठा प्रश्न असतो. दुसरीकडं खाजगी गाड्यांचे ड्रायव्हर्स अशा प्रकारे वागतात. हे माझं रोजचं जगणं आहे. ट्रॅफिक आणि या खाजगी वाहनांच्या अडचणींमुळं वेळेआधी घर सोडावं लागतं. दिवसभरातली सगळी कामं एकाचवेळी पूर्ण करावी लागतात. आपण ज्यांना 'प्रेरणा' म्हणतो, त्या अपंग व्यक्तींना रोज असा भेदभाव सहन करावा लागतो. एवढचं सांगायचं होतं, असं दिक्षा दिंडे यांनी म्हटलं आहे.

**सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षम नाही**

दरम्यान, पुण्यात महापालिकेनं सार्वजनिक वाहतूक व्यवस्था वेगवान करण्यासाठी बीआरटीएसचा पर्याय अवलंबला होता. परंतू आता जवळपास बहुतेक मार्गांवरील हा बीआरटीएस मार्ग वाहतुक कोंडीच्या नावाखाली बंद करण्यात आला आहे. या सुविधेसाठी महापालिकेनं मोठ्या प्रमाणावर उजव्या बाजूला दरवाजे असलेल्या बस खरेदी केल्या होत्या. या बस रस्त्याच्या मधोमध उभारण्यात आलेल्या बस थांब्यासाठी असतात. या बसेसमध्ये अपंग व्यक्ती आपल्या व्हिलचेअरसह बसू शकेल अशी जागाही राखीव ठेवण्यात आली आहे.

बीआरटीच्या बस थांब्यावरुन अशा व्हिलचेअरवरील व्यक्तीला प्रवेश करणं शक्य होतं. पण आता हे मार्गच बंद करण्याचा घाट घातल्यानं सर्वांसाठी असलेली एकमेव सार्वजनिक व्यवस्थाही अपंगांसाठी मात्र बंद झाली आहे. पुण्यात अद्याप मेट्रोचा पर्याय पूर्ण क्षमतेनं सुरु झालेला नाही. खासगी पर्यायामध्ये रिक्षात व्हिलचेअरवाल्या व्यक्तीला बसता येत नाही. तिच स्थिती कॅबची देखील बनली आहे.

# बारामतीत पोलिस लाचलुचपतच्या जाळ्यात; अपघाताचा गुन्हा दाखल न करण्यासाठी मागितले होते ३० हजार रुपये

**बारामती । प्रतिनिधी**

अपघाताचा गुन्हा दाखल न करण्यासाठी व या गुन्ह्यात अटक न करण्यासाठी ३० हजार रुपये लाचेची मागणी करत १० हजार रुपये लाच स्विकारण्याचे मान्य करणाऱ्या सुनील माणिक जगताप व प्रवीण भाऊसाहेब भोसले या दोघांविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला. जगताप हे येथील तालुका पोलिस ठाण्यात सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक म्हणून कार्यरत आहेत. तर भोसले हा खासगी इसम आहे.

या प्रकरणी तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केली होती. तक्रारदाराविरोधात अपघात प्रकरणी एक तक्रार दाखल होती. त्यावरून गुन्हा दाखल न करण्यासाठी आणि तो दाखल झाला तर त्यात अटक न करण्यासाठी जगताप यांनी त्यांच्याकडे ३० हजार रुपये लाचेची मागणी केली होती. तडजोडी अंती १० हजार रुपये लाच मागण्यात आली होती. प्रवीण भाऊसाहेब भोसले या खासगी इसमाने लाच मागणीस प्रोत्साहन दिले होते. या तक्रारीची शहानिशा करत अखेर सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक सुनील जगताप व खासगी इसम भोसले या दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.